दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३० | शनिवार दि.११ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आपल्याच वाचाळवीरांमुळे भाजप अडकले

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान पार पडलेले असताना भाजपची व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा व प्रचाराची दिशा पुरती बदललेली पहायला मिळते आहे. आता स्वत: मोदीही 'चारसौ पार'चा उल्लेख करताना दिसत नाहीत. तर त्यांनी आता काँग्रेस निवडून आल्यास अमूक होईल, तमूक होईल, अशी भीती मतदारांना घालण्यास सुरुवात केली आहे.

### केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर

नवी दिल्ली: दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मंजूर झाला आहे. नवी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सुप्रीम कोर्टाने दिल्लीच्या कथित मद्यधोरण प्रकरणात अंतरिम जामीन मंजूर केला आहे. हा जामीन १ जूनपर्यंत असेल. अरविंद केजरीवालांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी ४ जूनपर्यंत जामीन मिळावा अशी मागणी केली मात्र, प्रचार ४८ तास अगोदर संपतो असे सांगत १ जूनपर्यंत अंतरिम जामीन दिला. अरविंद केजरीवाल प्रचारादरम्यान या खटल्यावर काही बोलू शकत नाहीत. पंजाबमध्ये २५ मे तर दिल्लीत १ जूनला मतदान होणार आहे.

# शेतकरी हा अन्नदाता नव्हे तर उर्जादाता अन् हवाईदाता बनणार!

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास; कार्यकर्तृत्वान पंकजाला निवडूण द्या








माजलगाव। प्रतिनिधी

**महात्मा गांधी यांनी आपला भारत हा खेडेगावात आहे, असे सांगितले होते. मात्र गेल्या ६० वर्षात काँग्रेसच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे शेतकरी शेती सोडून शहराकडे वळला. आम्ही गेल्या १० वर्षात ऊस, मका, बांबु यापासून इथेनॉल निर्मिती केली. त्यावर वाहने चालू लागले आहेत. आता ऊसापासून हायड्रोजन आणि हवाई इंधन सुध्दा शेतकरी बनवणार आहे. त्यामुळे शेतकरी हा फक्त अन्नदाता नव्हे तर उर्जादाता आणि हवाईदाता बनणार असल्याचे केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी माजलगाव येथे सांगितले. भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत ते बोलत होते. पंकजा ही मुंडे फक्त मुंडे साहेबांची लेक म्हणून मोठी नाही तर ती कार्यकर्तृत्ववान आहे. त्यामुळे पंकजाला मोठ्या मताधिक्याने निवडूण देण्याचे आवाहन त्यांनी केले.**

लोकसभेच्या चौथ्या टप्यात म्हणजे दि. १३ मे रोजी बीड लोकसभेसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीकडून आपापल्या उमेदवाराच्या प्रचारार्थ नेत्यांच्या सभांचा धडाका सुरु आहे. माजलगाव येथील सभेला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नखुळे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, पंकजाताई मुंडे, खा. प्रितमताई मुंडे, आ. प्रकाश सोळंके, रमेश आडसकर, मोहन जगताप, डॉ. योगेश क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना गडकरी म्हणाले, काँग्रेसच्या काळात गरीबी कधीही हटली नाही, पान २ वर

### पंकजा मला माझ्या मुलीसारखी!

मला आज मुंडे साहेबांची आठवण होत आहे. मी नागपुरचा युवा अध्यक्ष होतो. त्यावेळी ते राज्य भाजपचे अध्यक्ष होते. ते जननेते होते, रात्र जरी त्यांच्याकडे कोणी आला तर ते त्याचे काम करायचे, त्यामुळे ते लोकनेते होते. राज्यात जो भाजपचा विस्तार झाला त्यात दोन नेत्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यात गोपीनाथ मुंडे आणि प्रमोद महाजनांचे नाव घ्यावे लागेल. ते मराठवाड्याच्या भुमितील होते. माझं सौभाग्य आहे की मला त्या दोन नेत्यांचा आशिर्वाद मला मिळाला, त्यांच्याबरोबर काम करायला मला मिळाले. त्यामुळे पंकजा ही मला माझ्या मुलीसारखी आहे. त्यामुळेही ही मोदींची गॅरंटी आहे आणि मी पण गॅरंटी घ्यायला माजलगावला आलो आहे, असे गडकरी म्हणाले.

### इथेनॉल पंप कारखान्यांना मिळणार

मी २००४ साली सांगितले होते या देशातील शेतकरी अन्नदाता नव्हे तर उर्जादाता व्हायला हवं. मी त्या वेळी वाजपेयींच्या काळात ब्राझीलला गेलो. तेथे इथेनॉलचा वापर आणि महत्व जाणून घेतले. त्यानंतर आम्ही इथेनॉल बनवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आज साखर कारखान्यांना चांगले दिवस आले. वाहनेही आता इथेनॉलवर चालत आहेत. पुढे साखर कारखान्यांना इथेनॉल पंप देण्याची आमची भुमिका असल्याचे ते म्हणाले.

### साखर कारखान्यात हायड्रोजन तयार होणार

पाण्यापासून आपण हायड्रोजन तयार केले. वाहन सुध्दा आता हायड्रोजनवर चालतात. आता पुढे साखर कारखान्यातील वेस्ट वॉटरपासून ग्रीन हायड्रोजन तयार केले जाणार आहे. त्यामुळे बस, ट्रक, विमान, रेल्वे, केमिकल इंडस्ट्री हे सर्व चालणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आपण आयात करणारा नव्हे तर इंधन निर्यात करणारा बनणार आहोत, असे गडकरी म्हणाले.

### संविधान कधीही बदलता येत नाही

कोणीही व्यक्ती, कोणतही सरकार हे संविधान बदलू शकत नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तसा आहे. तो सर्वांना बंदनकारक आहे. काँग्रेसने आतापर्यंत बाबासाहेबांचे संविधान ८० वेळा तोडले, हे पाप काँग्रेसवाल्यांनी केले आहे. आम्ही कधीही संविधान बदलले नाही. मात्र मते मिळवण्यासाठी काँग्रेसकडून चुकीचा प्रचार केला जात आहे.

### रस्ते विकासाला १० हजार कोटी दिल्याबद्दल गडकरींचे पंकजाताईनी मानले आभार

या जाहीर सभेत भाषणाच्या सुरवातीलाच आदरणी गडकरी असा उल्लेख करत नितीन गडकारींनी माझ्या वडिलांच्या सोबत राजकीय जीवनात काम केले. माझ्यासाठी ते नेता नसून काका असल्याचा उल्लेख त्यांनी केला. विकासाचे महापुरुष अशी ओळख त्यांची असून आपल्या बीड जिल्ह्यात रस्ते विकासासाठी केंद्रात पान २ वर

## पंकजाताईला सभेला घेऊन जाण्यासाठी स्वत: खा.विखे हेलीकॉप्टर घेऊन आले

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या जाहीर सभेशिवाय माझ्या विजय निश्चित होऊ शकत नाही. तेव्हा अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान खा. सुजय विखे पाटील हे स्वत: हेलीकॉप्टर घेऊन माजलगावात ताईंना घेऊन जाण्यासाठी आले. मंत्री नितीन गडकरींची सभा संपताच वादळ वारा सुरू असताना त्या हेलीकॉप्टरने नगरला गेल्या आणि विखे पाटलांसाठी जाहीर सभा घेत विजय निश्चित केला.

राज्यात अनेक लोकसभा मतदार संघातून पंकजाताई मुंडे यांच्या सभेला मागणी होत असून, त्यांच्या सभे शिवाय आपला विजय निश्चित होऊ शकत नाही. अशी अनेक उमेदवारांची भूमिका समोर येते. मध्यंतरी बुलढाणा लोकसभा मतदार पान २ वर

## दूध संस्थांचा कारभार आता जिल्हा परिषदेमार्फत चालणार!

### सरकार लवकरच मान्यता देण्याच्या विचारात

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाला मोठे महत्त्व येणार आहे. कारण राज्य सरकारचा पशुसंवर्धन विभाग आणि जिल्हा दुग्धविकास अधिकारी यांचे कार्यालय आता जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे आता दूध संस्थांच्या कारभाराचे नियंत्रणही जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात येणार आहे. अशी माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे.**

सध्याच्या घडीला राज्य सरकारचा आणि जिल्हा परिषदेचा असे दोन पशुसंवर्धन विभाग राज्यात कार्यरत आहेत. परंतु, राज्य सरकारचा विभाग आणि जिल्हा दुग्ध विकास अधिकारी कार्यालय जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला असून, त्याला मंत्रिमंडळाची मंजुरी देखील मिळाली आहे. याबाबत केवळ जीआर निघणे बाकी असल्याचे सांगण्यात येत आहे. लोकसभा आचारसंहितेआधी असा आदेश काढण्यासाठी पान २ वर

## ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप निश्चित



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक शोषणप्रकरणी कुस्ती संघटनेचे माजी अध्यक्ष आणि भाजप नेते ब्रिजभूषण शरण सिंह यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने ब्रिजभूषण यांच्यावर आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. ब्रिजभूषण यांच्यावर आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

ब्रिज भूषण यांच्यावर कलम ३५४ (महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्यावर पान २ वर

## मद्य घोटाळा: के. कविता आरोपी

नवी दिल्ली: अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी (दि.१०) अबकारी धोरणाशी संबंधित मनी लाँडरंग प्रकरणात दिल्ली न्यायालयात नवीन पुरवणी आरोपपत्र दाखल केले. ईडीकडून दाखल करण्यात आलेल्या पुरवणी आरोपपत्रात एकूण २२४ पाने आहेत, अशी माहिती ईडी सूत्रांनी दिली आहे. या आरोपत्रात ईडीने बीआरएस नेत्या के. कविता यांना आरोपी ठरवले आहे.

# आमच्यासोबत या..!

## पंतप्रधान मोदी यांचे शरद पवार, उद्धव ठाकरे यांना आमंत्रण

नंदूरबार । प्रतिनिधी

देशात सध्या सुरु असलेल्या लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील भाजपा उमेदवारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांचे आयोजन करण्यात येत आहे. यापार्श्वभूमीवर नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नकली पुत्र म्हणून उद्धव ठाकरे यांचा कुत्सित उल्लेख केल्याचे प्रकरण ताजे आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नंदूरबार येथील सभेत बोलताना उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी काँग्रेसमध्ये विलीन होण्यापेक्षा आमच्यासोबत यावे, पान २ वर


### लोकशाहीवर विश्वास नसणाऱ्यांसोबत जाणार नाही-शरद पवार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांना सोबत येण्याच्या ऑफरवर शरद पवारांची प्रतिक्रिया दिली आहे. लोकशाहीवर ज्यांचा विश्वास नाही त्यांच्यासोबत मी कधीच जाणार नाही, असे शरद पवारांनी म्हटले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार पुढे म्हणाले, जे देशाच्या हिताचे नाही त्यात माझे सहकार्य असणार नाही. अशा विधानांमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अस्वस्थता दिसून येत आहे. आम्हाला नकली म्हणण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला असा सवाल देखील त्यांनी यावेळी बोलताना उपस्थित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे संसदीय लोकशाही संकटात आहे. त्याचबरोबर आमची विचारधारा ही नेहरू आणि गांधी यांच्या विचारांची आहे असेही शरद पवारांनी पुढे म्हटले.

## डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणी दोघांना जन्मठेप, तिघांची निर्दोष मुक्तता

पुणे । प्रतिनिधी

**अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरण खटल्याचा तब्बल ११ वर्षांनी शुक्रवारी (दि.१०) निकाल लागला. दाभोलकर हत्या प्रकरणी पुण्यातील विशेष न्यायालयाने वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची निर्दोष मुक्तता केली. तर सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्याने त्यांना सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.**



डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून करणाऱ्या सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना पुण्यातील विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांच्या न्यायालयाने जन्मठेप आणि प्रत्येकी पाच लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तर डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, विक्रम भावे आणि संजीव पुनाळेकर यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

अंदुरे आणि कळसकर यांनी गोळीबार केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्या विरोधातील सक्षम पुरावे पोलिसांनी न्यायालयात सादर केले. त्या आधारे दोघांना शिक्षा सुनावण्यात येत आहे. तर, डॉ. तावडे याचा या गुन्ह्यात हेतू दिसून आलेला आहे. तसेच त्यावर संशय घेण्यासारखी परिस्थिती आहे. मात्र त्यांच्या विरोधात गुन्हा सिद्ध करण्यात पोलीस आणि सरकार पक्ष पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.९ मे २०२४


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ४४.०० क्विंटल | | |
| २,२५० | २,६७० | २,३६३ |
| ज्वारी/हायब्रिड: १६५.५० क्विंटल | | |
| १,७०० | ३,५८० | २,४८८ |
| मूग : ०.५० क्विंटल | | |
| ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ८०.०० क्विंटल | | |
| ४,५०० | १०,९६३ | ९,६०७ |
| उडीद : ५.५० क्विंटल | | |
| ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ७९.५० क्विंटल | | |
| २,०८५ | २,८०१ | २,४७७ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | | |
| ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: २१६.०० क्विंटल | | |
| ४,५७५ | ४,६०१ | ४,५८५ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | | |
| ५,६०० | ६,१०० | ५,७८७ |

# राज्यात चार दिवस अवकाळी पाऊस

पुणे । प्रतिनिधी

**उष्ण, दमट वातावरणात काहीसा बदल जाणवत असून, काही प्रमाणात उष्णता कमी झाली आहे. दरम्यान पुढील ४ दिवस राज्यातील बहुतांशी भागात पावसाची अधिक शक्यता आहे. मंगळवारपर्यंत (दि.१४) वादळी पावसाची शक्यता असल्याचेही भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.**



राज्यातील मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मंगळवार १४ मे पर्यंत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. दरम्यान विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिह्यांमध्ये गारपीट होण्याची संभावना देखील आहे. याशिवाय ४०-५० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा वाहणार असल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. महाराष्ट्रासह बिहार, छत्तीसगड, राजस्थान, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि लक्षद्वीपमध्ये कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यातील पुणे येथे शनिवार ११ मे आणि रविवार १२ मे तर नांदेड, लातूर, चंद्रपूर आणि यवतमाळमध्ये रविवार १२ मे रोजी ऑरेंज अलर्ट असून, मुसळधार पावसाची अधिक शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. १० मे रोजी नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अमरावती, भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वाशिम

११ मे रोजी रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहमदनगर, पुणे (ऑरेंज अलर्ट), कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर आणि यवतमाळ तर १२ मे रोजी ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा (ऑरेंज अलर्ट), सांगली, सोलापूर. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड (ऑरेंज अलर्ट), लातूर (ऑरेंज अलर्ट), धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर (ऑरेंज अलर्ट), गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम यवतमाळ (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. १३ मे रोजी रायगड, पान २ वर

छ.संभाजी नगर (धुत हॉस्पीटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे

एम.बी.बी.एस.एम.डी.मानसोपचार तज्ञ(Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट,व्यसनमुक्ती तज्ञ सेक्सोलॉलिस्ट
मो.9518551503 / 9545615352

महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी सकाळी १० ते २ साई गवते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे बीड व दु.२:३० ते ६ वा.डॉ.विश्वास जोशी समोर,प्रगती होमीओ क्लिनिक धोंडीपुरा,टिळक रोड,बीड

खालील आजारांचे निदान व उपचार

- डोकेदुखी
- आती चिंता व काळजी(सतत टेन्शन,घाबरटपणा,घाम सुटणे,थरकाप सुटणे,हाता पायात मुंग्या येणे)
- नैराश्य /उदासिनता(मनात सतत एक सारखे विचार येत राहणे,सतत शंका व्यक्तकरणे,अंधारात स्वत:ला कोंडून घेणे)
- झोपेच्या समस्या(झोप न येणे,झोपेत चालणे,बडबड करणे,चक्कर येणे,दातखिळी बसणे)
- व्यसनधिनता(दारू,तंबाखू ,गुटखा,धुम्रपान)
- बालकांचा समस्या(झोपेत लगवी करणे,हट्टीपणा,चिडचिड पणा,अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या(लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्न दोष)

स्किझोप्रेनिया व इतर मानसिक समस्या

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क मो.8237353737 / 8182839922

श्रीराम टेकाळे
(पुर्व गटशिक्षणाधिकारी,पाटोदा/शिरूर/बीड)
मो.९०७५३८७६३८



डॉ.जगदिश टेकाळे

## अग्रलेख

# आपल्याच वाचाळवीरांमुळे भाजप अडकले

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान पार पडलेले असताना भाजपची व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा व प्रचाराची दिशा पुरती बदललेली पहायला मिळते आहे. आता स्वत: मोदीही 'चारसौ पार'चा उल्लेख करताना दिसत नाहीत. तर त्यांनी आता काँग्रेस निवडून आल्यास अमूक होईल, तमूक होईल, अशी भीती मतदारांना घालण्यास सुरुवात केली आहे.

पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानानंतर भाजपची भाषाच बदलून गेली. हा चमत्कार कसा घडला? तर तो काँग्रेसने भाजपचा माईंडगेम अत्यंत आक्रमकपणे त्यांच्यावरच उलटवल्यामुळे घडला. 'चारसौ पार'च्या भाजपच्या माईंडगेमला त्यांच्याच पक्षातील वाचाळवीरांनी आपल्या बेताल वक्तव्याने सुरुंग लावला. कर्नाटकचे खासदार अनंत हेगडे, अयोध्येचे खासदार लल्लू सिंह, राजस्थानच्या ज्योती मिर्धा यांनी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा मिळाल्यास संविधान बदलण्याचा विचार असल्याचे वक्तव्य केले आणि काँग्रेसला भाजपला त्यांच्याच माईंडगेममध्ये अडकविण्याची आयती संधी मिळाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या संधीचा अत्यंत आक्रमकपणे वापर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान बदलण्यासाठी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा हव्या असल्याची तोफ डागली व भाजप पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलले जाईल, हा संदेश दलित, आदिवासी, मागासवर्गीय व तळागाळातील लोकांपर्यंत काँग्रेसने अत्यंत आक्रमकपणे पोहोचवला. भाजप आपल्याच वाचाळवीरांमुळे आपल्याच जाळ्यात अडकला व मागच्या दहा वर्षांत प्रथमच बॅकफूटवर गेला. स्वत: मोदी, शहा, नड्डा, संघप्रमुख मोहन भागवत यांना संविधान बदलले जाणार नसल्याचे खुलासे करणे भाग पडले. यामुळे भाजप या निवडणुकीच्या प्रचाराचे जे नॅरेटिव्ह सेट करू इच्छित होता ते समीकरण पुरते बिघडून गेले. मतदानाच्या तिसऱ्या टप्प्यानंतर आता त्याची प्रचिती येते आहे. भाजपच्या सेनापतीच्या प्रचारात आता विकसित भारताचा संकल्प हा तोंडी लावण्यापुरताच येतो आहे. मोदींना दहा वर्षांच्या आपल्या सत्ताकाळानंतरही आपली सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेसचे भूत लोकांसमोर उभे करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. काँग्रेसचे हे मोठे यशच मानायला हवे कारण मोदीपर्वात होणाऱ्या निवडणुकीत प्रथमच काँग्रेसने भाजपला आपल्या मैदानावर खेळायला भाग पाडले आहे. यातूनच भाजपची प्रचाराची दिशा पुन्हा ध्रुवीकरणाच्या हुकमी मुद्यावर आली आहे. यातूनच काँग्रेसची सत्ता आली तर हिंदू समाजाची संपत्ती हिसकावून घेतली जाईल, त्याचे फेरवाटप करून ती मुस्लिम समाजात वाटली जाईल, ओबीसी आरक्षणात मुस्लिमांना वाटेकरी करण्यात येईल, असा प्रचार आता स्वत: मोदी यांनीच सुरू केला आहे.

थोडक्यात या चमत्काराचे श्रेय काँग्रेसला द्यावे लागेल. काँग्रेसने भाजपचा माईंडगेम त्यांच्यावरच उलटवून सर्वच भाजपविरोधी राजकीय पक्षांना संजीवनी बुटी मिळवून देणारा ठोस मुद्दा उपलब्ध करून दिला आहे. त्यातूनच भाजपची भाषा पुरती बदलली आहे आणि 'चारसौ पार'ची घोषणा भाजपच्या प्रचारातून पुरती हद्दपार झाली आहे. अर्थात भाजप एवढ्याने हार नक्कीच मानणार नाही. पक्ष संघटनेच्या प्रचंड ताकदीच्या जोरावर हरलेली बाजीही भाजप शेवटच्या क्षणी जिंकू शकतो. त्याचा प्रत्यय मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेलाच आहे. अनुकूल वातावरण असतानाही काँग्रेसला मध्य प्रदेशात भाजपला सत्तेतून दूर करता आले नाही. मात्र, यातून काँग्रेसने योग्य तो बोध घेतलेला दिसतो. त्यातूनच सध्या तरी काँग्रेसने भाजपला त्यांच्याच माईंडगेमच्या जाळ्यात अडकवून टाकले आहे व त्यातून सुटण्याची धडपड म्हणून मोदी व भाजपने आपल्याच 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास'या घोषणेला तिलांजली देऊन ध्रुवीकरणाच्या हुकमी अस्त्राचा वापर सुरू केला आहे. त्यातूनच आता तिसऱ्या टप्प्याचे मतदान पार पडले असताना प्रचाराचा स्तर प्रचंड घसरला आहे. भाजपने संविधान बदलाची बेताल बडबड करणाऱ्यांना तिकिट नाकारून डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न केला असला तरी बृजभूषण यांच्या चिरंजीवांना तिकिट दिल्याने भाजपची सत्ता टिकविण्यासाठीची असहाय्यताही स्पष्ट होते आहे. तसेही भाजपला खरोखरच 'चारसौ पार'चा पल्ला गाठण्याचा आत्मविश्वास असता तर सुरत वा इंदूरमधून काँग्रेस उमेदवारांचे अपहरण करण्याचा मार्ग निवडावा लागला नसता. भाजप भलेही हे सगळे लोकशाही प्रक्रियेनुसार झाल्याचा दावा करत असला तरी तो खरा कोण मानणार? बहुमताचा आकडा गाठण्याची शाश्वती नसल्यानेच भाजपने हे तंत्र अवलंबिले आहे काय? असा प्रश्न या सगळ्या घटनाक्रमातून निर्माण होतो. भाजपच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी भाजपला नक्की मतदान करतील, हा भाजप नेत्यांचा दावा खरा मानला तरी या निवडणुकीत काँग्रेसने महागाई, बेरोजगारीच्या मुद्यावर सत्ताधारी भाजपची पुरती कोंडी केल्याचे चित्र स्पष्टपणे दिसते आहे.

## बीडकरांचा शायराना अंदाज : विकास के आंधी का नाम पंकजाताई

# आप सबकी दुवा मुझे मिलेंगी यही दुवा करती हूँ -पंकजाताई

## पंधरा वर्षात मुंडे कुटुंबाने मुस्लिम समाजाला कधीच त्रास दिला नाही-सलीम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी

**मै अपने नेता जैसी तो हूं , लेकीन उससे भी जादा मै अपने पिता जैसी हूं अशी भाषणाची सुरुवात करत भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी मंचावर उपस्थित सर्व कवी आणि शायर यांच्या कलेचे कौतुक केले. माझ्यावर आपला जो विश्वास आहे, तो विश्वास सार्थ ठरविन असे म्हणत ' आप सब की दुवा मुझे मिलेंगी यही दुवा करती हूं ' अशी अपेक्षा यावेळी पंकजाताई यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांपुढे व्यक्त केली. तर लोकं काय म्हणतात याच्याशी मला देणेघेणे नाही. पंकजाताई या माझ्या मोठ्या बहीण असून माझी पार्टी , माझा नेता अन् ? माझं सरकार म्हणजे फक्त मुंडे कुटूंब आणि पंकजाताईच आहेत असे सलीम जहाँगीर यांनी ठणकावून सांगितले. मुंडे कुटुंबाने गेल्या पंधरा वर्षात कधीच मुस्लिम समाजाला त्रास दिला नाही. या समाजाला साथ देण्याचे काम मुंडे परिवार आणि पंकजाताईंनी केल्याचे सलीम जहाँगीर यांनी सांगितले.**

बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड ) येथे बुधवारी रात्री जहाँगीर एज्युकेशनल, सोशल अँड वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने अखिल भारतीय उर्दू कवी संमेलन आणि मुशायरा संपन्न झाला. यावेळी पंकजाताई मुंडे यांची विशेष उपस्थिती होती. श्रोत्यांमध्ये बसून पंकजाताई मुंडे , भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के , डॉ. योगेश क्षीरसागर , आदित्य सारडा , सलीम जहाँगीर , जे.डी. शाह , मुसा खान , नूरलाला , सज्जाद काझी इस्माइल सय्यद, शैख तकियुदीन,आलिम जहांगीर,कलीम जहांगीर,रियाज सिद्दीकी,मजहर काज़ी यांच्यासह मान्यवरांनी पूर्ण वेळ कवी संमेलन आणि मुशायराचा आनंद लुटला. यावेळी उत्तर प्रदेशचे नदीम फरूख, देवबंदी येथील डॉक्टर माजीद, हाशिम फिरोजाबादी, उत्तराखंडचे सज्जाद झंझट, अमरावतीचे जावेद इशाअती, कानपुरच्या शबीना अदीब, उत्तराखंडच्या निकहत अमरोही, नैनीतालच्या तरन्नुम निशात या मातब्बर कवींनी आणि शायर यांनी एक से बढकर एक शायरींचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. शायर शबिना अदीब यांनी देशभक्तीभर कविता आणि शायरी करून टाळ्या मिळवल्या. ' विकास के आंधी का नाम पंकजाताई ' यासह मुंडे सहाब की शहेजादी असा पंकजाताईंचा उल्लेख करत उपस्थित कवींनी त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. तर कॉमेडी किंग एहसान कुरेशी यांनी शायरींसह मजेदार किस्से सुनावत महेफीलमध्ये रंग भरले. यावेळी सलीम जहाँगीर यांनी पहिल्यांदाच रोखठोक बोलत मी आणि माझा नेता याविषयीची भूमिका स्पष्ट केली. सलीम जहाँगीर म्हणाले,



मी ज्या पक्षात काम करतो त्यावेळी मी कधी पक्ष पाहत नाही. मी फक्त आणि फक्त मुंडे कुटुंबालाच पाहतो. माझी पार्टी, माझा नेता आणि माझं सरकार फक्त मुंडे कुटूंब आणि पंकजाताईच आहेत. मी अनेक वर्षांपासून त्यांच्यासोबत काम करत आहे. मुंडे कुटुंब मुस्लिम समाजाला सोबत घेऊनच चालतो. या कुटुंबात तीन टर्म खासदार झाले. गोपीनाथ मुंडे साहेब आणि त्यानंतर प्रितमताई दोन वेळा खासदार झाल्या.मात्र या पंधरा वर्षात बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजाला एक रुपयाचाही त्रास झाला नाही. हे सर्वजण आम्हा सगळ्यांना सोबत घेऊन चालतात. आज पंकजाताई लोकसभेच्या उमेदवार आहेत. त्या अभ्यासू आहेत, हुशार आहेत मात्र त्याहीपेक्षा त्या दिल्लीतील केंद्र सरकारला, प्रधानमंत्र्यांना थेट बोलू शकतात. अमित शहा, राजनाथ सिंग यांनाही त्या बोलू शकतात.खासदार झाल्यानंतर जिल्ह्यातील दहा हजार बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याचा त्यांनी केलेला निर्धार माझ्या जिल्ह्याच्या आणि माझ्या समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. गोपीनाथ मुंडे साहेब, प्रितमताई मुंडे यांनी आपल्या खासदारकीच्या काळात अनेक कामे केली. पंकजाताईंनीही मुस्लिम समाजाचे अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावले आहेत आणि लावतीलही. त्यामुळे दिल्लीत कोण आहे हे पाहू नका. समोर पंकजाताई आहेत त्यांनाच पहा. आपल्या सोबत असताना त्यांनी आपल्यासाठी केलेली कार्य पहा असे आवाहन त्यांनी केले. मात्र गेल्या काही दिवसात बीड शहर आणि जिल्ह्यातील चित्र पाहून मनाला वेदना होत आहेत. मुंडे कुटुंब आणि माझ्या नेत्या मुस्लिम समाजाच्या सुखदुःखात येतात. भारतीय जनता पार्टी मुस्लिम समाजाच्या विरोधात नाही. मात्र राजकारणात वरिष्ठ पातळीवरील काही राजकीय समीकरणे असतात. त्यातून काही वक्तव्य करावी लागतात याचा अर्थ चुकीच्या पद्धतीने लावला जातो. मुस्लिम समाजासोबत भाजप खरोखरच जातिवाद करत असता तर आज बीड जिल्ह्यात ३३ हजार घरकुल मिळाले, त्यापैकी २२ हजार घरकुल मुस्लिम कुटुंबाला मिळाले आहेत. केंद्राच्या सर्व योजनांचा लाभ मुस्लिम समाजाला मिळतो मग कसला आलाय जातीवाद ? असा प्रश्न सलीम जहांगीर यांनी उपस्थित केला. पंकजाताई यांनी नेहमीच मुस्लिम समाजाला साथ देत सोबत घेतलेले आहे. त्यामुळे आपल्या ताईंसाठी दुवा करा असे आवाहन सलीम जहाँगीर यांनी केले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वादळी वाऱ्याच्या पावसाने जिनिंगचे लाखो रुपयांचे नुकसान

घाटसावळी । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे गगनाथवाडी येथील सद्गुरू जिनीग अड प्रेसीगचे अवकाळी पावसामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील सततच्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांसह उद्योग व्यवसाय चे लाखो रुपयनुकसान झाले असून यामध्ये काल पिपळनेर परिसरासह गगनाथवाडी येथे वादळी वाऱ्यासह पावसाने येथील गट न २५६ मधील सद्गुरू जिनीग अड प्रेसीगचे अवकाळी पावसामुळे शेडवरीस पत्रे उडुन गेल्याने कापुस गठान सरकी शेडसह लाखों रूपा याचे नुकसान झाले.

# गरजवंतांचा आधार बाजीराव चव्हाण यांना 'आरोग्यदूत' सन्मान प्रदान



बीड । प्रतिनिधी

**रूग्णसेवेला संपूर्णपणे झोकून दिलेले धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे विश्वासू बीडचे भुमिपूत्र बाजीराव चव्हाण यांना 'आरोग्यदूत' सन्मान प्रदान करण्यात आला.**

'लोककल्याणकारी आरोग्यदूत' हे मासिक गेली दीड वर्ष संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होत आहे. महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, लोकप्रिय खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेशजी चिवटे संपादकीय सल्लागार असलेल्या 'आरोग्यदूत'च्या वतीने रूग्णसेवेतील भरीव योगदानाबद्दल बाजीराव चव्हाण यांना 'आरोग्यदूत' सन्मान आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने, सहसंपादक भगीरथ तोडकरी, धर्मवीर प्रतिष्ठानचे सचिव डॉ.ज्ञानेश्वर जाधव यांच्या हस्ते जगतद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त प्रदान करण्यात आला.

### बाजीराव चव्हाण यांचे रूग्णसेवेत भरीव योगदान

समाजातील गोरगरीब आणि गरजू रूग्णांना मदत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि धर्मवीर प्रतिष्ठानच्या माध्यमातून बाजीराव चव्हाण यांनी मोलाचे योगदान दिले आहे. मराठवाड्यातील शेकडो गरजवंतांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळाल्याने मोठा आधार दिला जात आहे. या सर्व बाबींचा विचार करून 'लोककल्याणकारी आरोग्यदूत'च्या वतीने बाजीराव चव्हाण यांना यथोचित सन्मान केला, असल्याची माहिती संपादक बाबा देशमाने, सहसंपादक भगीरथ तोडकरी यांनी दिली.

# ज्योती वैजवाडे यांचे निधन

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी



**येथील बजाज हॉस्पिटल मधील असि. मॅनेजर धनंजय वैजवाडे यांचे पत्नी व गुलाब भावसार यांची कन्या सौ ज्योती वैजवाडे हिचे आज पहाटे दिर्घ आजाराने निधन झाले .मृत्यु समयी त्या४८ वर्षीच्या होत्या.**

दैनिक युवासोबतीत त्या ऑपरेटर म्हणुन कार्यरत होत्या.येथील प्रतापनगर स्मशानभुमित त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले .यावेळी बजाज हॉस्पिटल मधील कर्मचारी,महायोग परिवारातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी दोन मिनीट स्तब्धता पाळून भावपुर्ण श्रदांजली वाहण्यात आली वैजवाडे ,भावसार परिवाराचे दुःखांत दै.राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## पान १वरून...

### शेतकरी हा अन्नदाता नव्हे तर

आता राहूल आणि सोनिया गांधी सांगतात की, आम्ही गरीबी हटवू, मात्र त्यांच्यापेक्षा आम्ही १० वर्षात चांगली कामे केली. प्रितमताई यांनी माझ्याकडे काही कामे दिली होती. ती कामे आम्ही केली आहेत. माझ्या आयुष्यात चांगली कामे करण्याची मला संधी मिळाली पण पालखी मार्ग, शेगाव ते पंढरपुर, माजलगाव ते ही कामे केल्याचा आनंद वाटतो. माजलगाव ते तेलगाव हा रस्ता खराब झाला आहे, मी कधीही गुत्तेदाराची बाजू घेतली नाही. खराब कामे करणाऱ्याची गय केली जाणार नाही. हा रस्ता तात्काळ दुरुस्त करुन दिला जाईल, असेही गडकरी यांनी सांगितले. एकदा पंकजाला निवडूण द्या, बीड जिल्ह्याला देशातील चांगला जिल्हा म्हणून बनवण्याचा आमचा प्रयत्न असेल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. विकासात दोन क्षेत्र आहेत, एक कृषी तर दुसरे व्यापारी क्षेत्र आहे. कृषीचे फक्त १२ टक्के योगदान आहे. देश स्वातंत्र झाला त्यावेळी महात्मा गांधी म्हणायचे आपला देश गावात राहतो. ९० टक्के लोक गावात राहत होते. मात्र काँग्रेसच्या ६० वर्षाच्या काळात काय झाले. तर गावे ओस पडली. ३० टक्के गावातील लोक शहरात गेली. गावात सुविधा नसल्याने लोक शहरात गेले. शहरातील झोपडपट्टीत राहायला गेले, त्यासाठी काँग्रेसचे चुकीचे आर्थिक धोरण आहे, असे गडकरी म्हणाले. आम्ही ब्राझीलमध्ये जावून इथेनॉलचा अभ्यास केला आणि त्यावेळी २००४ साली तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी देशात इथेनॉल निर्मितीला मंजूरी दिली. त्यामुळे आज ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखरेमुळे नव्हे तर इथेनॉलमुळे चांगले दिवस आले, असे गडकरी म्हणाले. शेतकरी हा अन्नदाताच नाही तर उर्जादाता आणि आता हवाई इंधन तयार करणार आहे, असे सांगितले. याबरोबरच शेतकरी डांबर सुध्दा तयार करीत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार आहेत. त्यासाठी आपल्याला नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी पंकजाताईला मोठ्या मताधिक्याने निवडूण द्या, असे आवाहन केले. या सभेला भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. प्रकाश दादा सोळूंके, आ. लक्ष्मण पवार, मोहन जगताप, रमेशराव आडसकर, देविदास राठोड, बाबुराव पोटभरे, नितीन नाईकनवरे, डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, अरुण आबा राऊत, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन शहर अध्यक्ष दळवी यांनी मांडले. अक्षय तृतीयाचा दिवस असताना देखील मोंढा मैदानावर पार पडलेल्या सभेला मोठ्या संखेने लोक उपस्थित होते.

**रस्ते विकासाला १० हजार कोटी दिल्याबद्दल**

सरकार आल्यानंतर माझ्या एका पत्रावर सुमारे दहा हजार कोटी काम मंजूर केल्याबद्दल त्यांनी जाहीर सभेत त्यांचे आभार मानले. बीड जिल्ह्यात आम्हाला तरुणांना रोजगार मिळावा महणून एक मोठा उद्योग आणि गरिबांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सर हॉस्पिटल उभा करायचे असून आमचे पालकत्व स्वीकारावे असे सांगत राजकारणात काम करताना मी केवळ विकासाचे राजकारण केल्याचा उल्लेख त्यांनी केला.

-------------

### ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर

हल्ला करणेकिंवा गुन्हेगारी बळजबरी करणे), ३५४-अ (लैंगिक छळ) आणि कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत आरोप निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. त्यांच सचिव विनोद तोमर यांच्यावर कलम ५०६(१) अंतर्गत आरोप निश्चित करण्याचे पुरावे असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. १५ जून २०२३ रोजी दिल्ली पोलिसांनी ब्रिजभूषण सिंह विरुद्ध कलम ३५४ (महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्यावर हल्ला करणे किंवा गुन्हेगारी बळजबरी करणे), ३५४-अ (लैंगिक छळ), ३५४- आणि कलम ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले.

---------------

### दूध संस्थांचा कारभार आता

प्रयत्न झाले, परंतु ते शक्य झाले नाही. या नव्या रचनेत जिल्ह्यात जितके श्रेणी २ चे पशुसंवर्धन दवाखाने आहेत ते श्रेणी १ होणार असून, त्या ठिकाणी वर्ग १ चे पशुधन विकास अधिकारी कार्यरत राहणार आहेत. तसेच प्रत्येक तालुक्याला पशुसंवर्धन सहायक आयुक्त हे पद राहणार आहे. जिल्हा दुग्ध विकास अधिकाऱ्यांचे कार्यालयच जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात येणार असल्याने, दूध संस्थांची नोंदणी आणि रद्दची प्रक्रिया, निवडणुका हा सर्व कारभार जिल्हा परिषदेतून होणार आहे.

**पशुसंवर्धन उपायुक्त सीईओंच्या नियंत्रणाखाली**

या नव्या बदलामुळे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे पद कमी होणार असून, या ठिकाणी पशुसंवर्धन उपायुक्त हे या विभागाचे प्रमुख असतील आणि ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करतील. तसेच त्यांच्या हाताखाली योजना, तांत्रिक कामकाज आणि गुणवत्ता नियंत्रणाचे काम पाहणारे असे तीन स्वतंत्र सहायक आयुक्त कार्यरत राहतील. असेही सांगण्यात येत आहे.

--------------

### पंकजाताईला सभेला घेऊन जाण्यासाठी

संघात खा. प्रताप जाधव यांनी त्यांचा विजय निश्चित करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा घेतली तिथे जाधवांचा विजय निश्चित झाला. राज्यात अनेक ठिकाणी त्यांना मानणारा वर्ग असून, सभेची मागणी होताना दिसते. माजलगावात नितीन गडकरी यांची सभा त्यासाठी उमेदवार म्हणून पंकजाताई उपस्थित होत्या. काही दिवसांपूर्वीच त्यांनी नगरला सुजय विखे पाटलांना येण्याचा शब्द दिला होता. कारण त्या मतदार संघात पंकजाताई शिवाय विजय निश्चित होऊ शकत नाही. असे राजकीय संकेत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत देखील त्यांनी नगर जिल्ह्यात जाऊन विखे पाटलांसाठी सभा घेतल्या ज्यामुळे ते विजयी झाले होते. तस पाहता यंदा पंकजाताई स्वत: च उमेदवार बीड लोकसभा मतदार संघातूंन निवडणूक लढवत आहेत. प्रचारात व्यस्त असताना अचानक नगरचे उमेदवार खा. सुजय विखे पाटील माजलगावात पंकजाताईला घेऊन जाण्यासाठी खास हेलीकॉप्टर घेऊन आले. त्यांना दिलेला शब्द पूर्ण करताना आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान पदी बसवण्यासाठी एक खासदार महत्वाचा हा दृष्टिकोण मनात ठेऊन हवामान चांगले नसताना वादळ वाऱ्यात सायंकाळी ४ वाजता पंकजाताईला घेऊंन हेलीकॉप्टर नगरच्या पाथर्डीसाठी टेकप झाल. त्या ठिकाणी पंकजाताईची विराट सभा झाली. ज्या सभेत त्यांनी सुजय विखेच्या विजयावर शिक्का मोर्तब केले. सांगायचे तात्पर्य एवढच आहे की एवढी मोठी राजकीय ताकत असलेल नेतृत्व बीड लोकसभा मतदार संघात निवडणूक लढवत आहे. हा खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यातील तमाम मतदार, सामान्य जनतेसाठी स्वाभिमान असून, उद्या त्यांना खासदार करूंन दिल्लीला पाठवले तर बीड जिल्ह्याचा विकास कसा होऊ शकेल, म्हणूच त्यांना निवडणू देण्यासाठी जिलहाभरात आता स्पर्धा लागलेली दिसते.

------------

### डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणी दोघांना

अपयशी ठरले. तर भावे आणि पुनावळेकर यांच्या विरोधात देखील सक्षम पुरावे सादर करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे त्यांना या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत असल्याचे जाधव यांनी निकालात नमूद केले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर मॉर्निंग वॉकला गेले असताना २० ऑगस्ट २०१३ या दिवशी त्यांची महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेने अवघे राज्य हादरले. दाभोलकरांच्या हत्येनंतर तब्बल आठ वर्षांनी हा खटला सुरू होण्यास मुहूर्त लागला. या हत्या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊन सप्टेंबर २०२१ मध्ये पुण्यातील विशेष न्यायालयाने पाच आरोपींविरोधात आरोप निश्चित केले आणि खटल्यास सुरुवात झाली. जवळपास अडीच वर्षांपासून हा खटला सुरू आहे. या खटल्याची सुनावणी नुकतीच पूर्ण झाली आणि शुक्रवारी (दि.१० मे) या खटल्याचा निकाल लागला. २०१४ मध्ये सीबीआयने डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणाचा तपास सुरु केला. २०१९ मध्ये पाच आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पाचही आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले. सप्टेंबर २०२१ मध्ये खटला सुरू झाला होता.

------------

### आमच्यासोबत

असे थेट आमंत्रणच या दोन्ही नेत्यांना दिले आहे. पुढे बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले की, लोकसभा निवडणूकीनंतर जे ओबीसीचे आरक्षण काढून घेऊन त्या विशिष्ट समाजातील लोकांना देणार आहेत, त्यांच्यासोबत जाण्यापेक्षा शरद पवार यांनी अजित पवार यांच्यासोबत तर उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत येत आमच्यासोबत यावे असे आमंत्रण शरद पवार आणि उद्धव ठाकरे याना दिले. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आदिवासींची सेवा ही कुटुंबाची सेवा आहे. या भागात जंगलात राहणाऱ्या लोकांना पाणी आणि विजेची खूप समस्या होती. पण आमच्या सरकारने तो प्रश्न सोडवला असून पीएम आवास अंतर्गत १.२५ लाख लोकांना घरे देण्यात आली आहेत. आता जी कुटुंबे यापासून वंचित आहेत अशांचा शोध घ्या तसेच ज्या कुटुंबांना गॅस, घर किंवा पाणी मिळालेले नाही त्यांची नावे पाठवा, असे आवाहनही त्यांनी केले. आपल्या सरकारच्या तिसऱ्या टर्ममध्ये तीन कोटी लोकांना कायमस्वरूपी घरे मिळतील, या हमीचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. सध्याची कामे हा फक्त ट्रेलर असून अजूनही लोकांसाठी खूप काही करायचे आहे, असे ते म्हणाले. काँग्रेस सतत खोटे बोलत असून धर्माच्या आधारे आरक्षण देऊन काँग्रेसने संविधानाच्या पाठीत वार करण्याचे पाप केले आहे. आदिवासी, मागासवर्गीयांचे आरक्षण हिसकावून ते अल्पसंख्याकांना देण्याचे काँग्रेसचे उद्दिष्ट असून कर्नाटकातील मुस्लिमांना रातोरात मागास करण्यात आले, त्याप्रमाणे कर्नाटकचे मॉडेल संपूर्ण देशात लागू करण्याचा काँग्रेसचा कट आहे. ही महाविकास आघाडी आरक्षण खाऊन टाकण्याची मोठी मोहीम राबवत आहे, असा आरोप करून मोदी म्हणाले, एससी, एसटी, ओबीसीचे आरक्षण वाचवण्यासाठी मी महायज्ञ करत आहे. आरक्षणाचे तुकडे करणार नाही आणि त्यातील कोणताही भाग मुस्लिमांना देणार नाही, याची ग्वाही काँग्रेसने द्यावी, अशी आमची मागणी होती, परंतु मात्र काँग्रेसकडून याला प्रतिसाद मिळाला नाही असेही यावेळी ते म्हणाले.

---------------------

### राज्यात चार दिवस

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ आणि १४ मे रोजी पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर याठिकाणी पावसाचा इशारा दिला आहे.

-------------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ११ मे २०२४


## प्रहारचे परळी तालुकाध्यक्ष विष्णू आरसुळे यांचा धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



परळी वैद्यनाथ : प्रहार जनशक्ती पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष तथा कौडगाव हुडा ग्रामपंचायत सदस्य विष्णू आरसुळे यांनी आज प्रहार पक्षाला सोडचिट्टी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

विष्णू आरसुळे हे मागील काही वर्षांपासून प्रहार पक्षाचे परळी तालुक्यात काम करत असून आता आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीला बळकट करण्यासाठी काम करणार असल्याचे विष्णू आरसुळे यांनी म्हटले आहे. तर धनंजय मुंडे यांनी त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शितलदास आरसुळे यांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# लोकशाही उत्सवाची प्रशासनाकडून जय्यत तयारी

## पिण्याचे पाणी, रांगांसाठी मंडप, प्रथम उपचार, बसण्यासाठी व्यवस्था ,सीसीटीव्ही कॅमेरे लागणार

**बीड । प्रतिनिधी**


**बीड जिल्हा प्रशासनाने१३मे रोजी होणाऱ्या बीड लोकसभा मतदारसंघासाठी संपुर्ण तयारी केली असून जास्तीत जास्त मतदारांनी कडक उन्हातही मतदान करावे .यासाठी अत्यावश्यक सुविधा मतदान केंद्रावर पुरवल्या जाणार आहेत. यामध्ये मतदार रांगांसाठी सावली मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ,औषधोपचार, बसण्याची व्यवस्था याबरोबरच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सुविधा या ठिकाणी असणार आहे. जास्तीत जास्त मतदारांनी या लोकशाही उत्सवात सहभागी होऊन लोकशाही मजबूत करावी असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी मतदारांना केले आहे. येच्या सोमवारी बीड लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे .**

याची संपूर्ण तयारी प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे .मशीन तपासणीसह या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा त्यांना प्रशिक्षण याबरोबरच मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी वाहनांची सुविधा प्रत्यक्ष मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मतदारांना उन्हात रांगेत उभे राहावे लागणार असल्याने त्यांच्यासाठी मंडपाची व्यवस्था एखाद्याला काही अडचण आली तर प्रथम उपचार सुविधा याशिवाय लहान मुलांसाठी स्वतंत्र रूम आणि त्यांची काळजी घेण्यासाठी अंगणवाडी सेविका वयोवृत्त लोकांसाठी प्रथम उपचार करण्यासाठी आशा वर्करची नेमणूक याबरोबरच या ठिकाणी वेब कास्टिंग ची सुविधाही करण्यात आली आहे या कॅमेऱ्याचे सर्व बाबीवर लक्श असुन याची कनेक्टिव्हिटी थेट जिल्हाधिकारी कार्यालयातील कंट्रोल रूम मध्ये असणार आहे. या ठिकाणाहून जिल्ह्यातील बुथवर कुठे काय चालू आहे .याची इत्थंभूत माहिती या ठिकाणी मिळणार आहे. याशिवाय ज्या ठिकाणी मोबाईल ला रेंज नाही किंवा नेटवर्क नाही अशा ठिकाणी वाकी टाकीची व्यवस्था ही करण्यात आली आहे. प्रत्येक दोन तासाला मतदानाची टक्केवारी कळवली जाणार आहे .एखादी मशीन खराब झाली तर त्याला पर्याय म्हणून दुसरी मशीन तात्काळ उपलब्ध असणार आहे .मतदान झाल्यानंतर या मशीन कडेकोट पोलीस बंदोबस्तात बीड येथील पॉलिटेक्निक कॉलेज नाथापुर रोड या ठिकाणी आणण्यात येणार आहेत. मशीन आल्यानंतर या ठिकाणी तिहेरी बंदोबस्त राहणार आहे या ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत सुरुवातीला केंद्रीय पोलीस दर त्यानंतर राज्य पोलीस दल आणि त्यानंतर स्थानिक पोलीस अशी सुरक्षा या ठिकाणी असणार आहे .या काळात दारूची दुकानेही बंद ठेवण्यात येणार आहेत. बीड जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर बी एल ओ असणार आहेत. अपंग मतदानासाठी ६३ ठिकाणी व्हील चेअर ची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यातील २२ ठिकाणी मोबाईल रेंज येत नाही त्या ठिकाणी वाकी टाकीची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी मायक्रो ऑब्झर्वर उपस्थित राहणार असून हे आपली माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणार आहेत. जिल्ह्यामध्ये १८९६ महिला अधिकारी राहणार असून ६३ मतदान केंद्र केंद्रावर पूर्णपणे महिला कर्मचारी असणार आहेत .कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलेट ची सुविधा देण्यात आली असून ही प्रक्रिया १३ तारखेपर्यंत चालणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे .यावेळी अप्पर जिल्हाधिकारी निर्गुण त्रिगुण कुलकर्णी,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,सहाय्यक निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे ,जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे आदींची उपस्थिती होती.

## श्रीक्षेत्र सावरगाव घाट येथे मच्छिंद्रनाथ वारकरी शिक्षण संस्था व संत मुक्ताई संगीत वर्ग सुरू

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र सावरगाव येथे मच्छिंद्रनाथ वारकरी शिक्षण संस्था व संत मुक्ताई संगित क्लासेस सुरू होत असून या क्लासचे उद्घाटन डॉ. ज्योतिताई विनायकराव मेटे यांच्या शुभहस्ते होणार आहे.गर्भागिरीच्या पावन भुमित शनिवार दि.११/५/ २०२४ रोजी सायं. ७.०० वा. कार्यक्रमास सुरूवात होईल.गावातील व पंचक्रोशील ज्याना सुवर्ण संधीचा लाभ घ्यायचा असेल व परमार्थीक क्षेत्रामध्ये आपले भवितव्य घडवायचे असेल.अश्या तरूण व बाल विदयार्थानी व थोरामोठयांनी महिलांनी यांचा लाभ घ्यावा.असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे या



**डॉ.ज्योतिताई मेटे यांची प्रमुख उपस्थिती**

क्लासमध्ये मृदुंग वादक, हार्मोनियम वादक, गायक, सहस्त्रनाम,हरिपाठ,टाळ इ. गोष्टी संगित विशारद शिक्षकाकडून शिकवल्या जातील, या संगित क्लाससाठी व वारकरी शिक्षण संस्थेसाठी आशिर्वाद रूपी हात खालील महाराज उद्घाटक रूपी सुरूवात वारकरी सप्रादायांची अनाथाची मुक्ताई माय ह.भ.प. आश्विनीताई म्हात्रे यांच्या किर्तनाने शुभारंभ होईल.या कार्यक्रमाला सौ.शुभदाताई प्रदिप चव्हाण (डी.वाय.एस.पी.मुंबई)मा.आ. साहेबरावजी दरेकर नाना ह.भ.प. गानकोकीळा भागवतार्च साध्वी सोनालीदीदी, ह.भ.प.राजेंद्र महाराज गोरे (मिरजगांव), करपे (चंकलाबा) ॲड.श्री.प्रदिप भाऊ चव्हाण श्री. प्रमोद शेठ बेद्रे (सोने चांदीचे व्यापारी तिसगांव) मा.श्री.शिवाजीराव डोके महाराज मा.श्री. ज्ञानेश्वर दादा चौधरी (अध्यक्ष शिवसंग्राम आष्टी) श्री.मचिंद्र खाकाळ यांच्या उपस्थिती लाभणार आहे तसेच ह.भ.प. विजयानंदजी स्वामी,ह.भ.प.स्वर भुषण योगितताई हजारे रामतिर्थ सालेवडगांव ह.भ.प. आशाताई राऊत भागवताचार्य लातुर ह.भ.प.मिनाताई मडके गदेवाडी ह.भ.प.मयुरीताई ब्राम्हणे - संगित विषारद,संगित विषारद संजिवणीताई शिंदे, मृदूंगविशारद-अश्विीताई मतसागर, श्री.शिवाजीराव चंदनशिव (सर) अनाथाची माय मुक्तामाय ह.भ.प.अश्विनीताई म्हात्रे (डोंबीवली मुंबई) यांच्या सुश्राव्य किर्तनाने व मार्गदर्शनाने संस्थेचा प्रारंभ होईल.या सुवर्ण संधीचा व किर्तन श्रवणाचा सर्वानी लाभ घ्यावा संचालक श्री. शिवाजी म्हस्के,श्री.राजेंद्र म्हस्के असे आवाहन करण्यात आले आहे



## अशोक हिंगे पाटील यांनी गोविंद मस्के कुटुंबियांची घेतली सांत्वन भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई शहर अध्यक्ष गोविंद आबा मस्के यांच्या वडिलांचे अल्पशः आजाराने दुःखदनिधन झाले. बीड लोकसभेच्या प्रचार दौऱ्यात वेळात वेळ काढून अशोक हिंगे पाटील यांनी कबीर नगर मस्के कुटुंबीयांच्या घरी सांत्वन भेट दिली. त्याप्रसंगी जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, बालाजी जगतकर, अजय सरवदे,धम्मानंद कासारे, बिभीषण चाटे,अनिल डोंगरे, बाबुराव मस्के, अरूण बनसोडे, परमेश्वर लांडगे, चांदभाई, स्वप्निल ओव्हाळ, अभिप्राय मस्के आदी उपस्थित होते.

## थोर समाज सुधारक संत महात्मा बसवेश्वर महाराज यांची ९१९ वी जयंती किल्ले धारूर शहरात उत्साहात साजरी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

अक्षय्य तृतीया अनेकार्थाने महत्त्वाची ठरते. साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाल्याचे सांगितले जाते. महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रसारक धर्मगुरू मानले जातात. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सांगितलेले विचार आजही लागू पडतात, असे सांगितले जाते. संत बसवेश्वर यांच्या जीवनकार्याचा घेतलेला अगदी थोडक्यात आढावा.

मंगळवेढा राज्यातील बागेवाडी या छोट्या गावात मंडगी मादिराज आणि मादलांबिका या पाशुपत शैव कम्मे कुळातील दाम्पत्यापोटी २५ एप्रिल ११०५ रोजी अक्षय तृतीयेच्या मूहुर्तावर महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. वयाच्या आठव्या वर्षी ते शिवज्ञान मिळविण्यासाठी कुडलसंगम येथे भगवान शिवाच्या मंदिरात गेले. हे पाशुपत शैवांचे (शिवाचे) प्राचीन अध्ययन केंद्र होते. बसवेश्वरांनी तेथे एक तप म्हणजे १२ वर्षे वास्तव्य करून अध्ययन केले. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म व तत्वज्ञानाचा अभ्यास केला, धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण अशा क्षेत्रांतील त्यांचे कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक,



राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणून संत बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील सोलापूर येथील मंगळवेढा येथे त्यांनी तब्बल ३१ वर्षे वास्तव्य केले होते. बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातूनच लिंगायत धर्माची स्थापना केली, असे सांगितले जाते. धर्मप्रसारासाठी श्रवणबेळगोळा, बसवकल्याण या कर्नाटकातील प्रदेशांत आले. लिंगायत समाज बसवेश्वरांना शिववाहन नंदीचा अवतार मानतात. बसव, बसवाण्णा, बसवराय अशा नावांनी ते प्रसिद्ध होते.

अशा महाविभूती संत महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती किल्ले धारूर शहरात साजरी करण्यात आली प्रसंगी प्रवीण शेटे, ज्ञानेश्वर शिंदे, आसाराम भारस्कर,सोमनाथ शिनगारे,नितीन शेटे, आश्विन गुळवे, गणेश कापसे, अजित इंदोरे,कृष्णा थोरात, निखिल शिंदे, राजू हजारी व इतर उपस्थित होते.

## परिचर्या सप्ताहानिमित्त अंबाजोगाईत क्रिकेट स्पर्धा



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आधुनिक परिचर्येचा पाया घालणारी ब्रिटिशप्रणेती फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा जन्मदिन म्हणजे जागतिक परिचारिका दिन. हा परिचर्या दिन नुकताच सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धांचा शुभारंभ करण्यात आला.

येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात फ्लोरेन्स नाईटिंगले यांचा जन्मदिवस परिचर्या दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, याशिवाय या निमित्ताने परिचर्या सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याच उपक्रमांतर्गत आज महाविद्यालयाच्या प्रथम, व्दितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धा वैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानावर घेण्यात आल्या. या स्पर्धांचे अनौपचारिक उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, रुग्णालयाच्या मेटर्न कुडमतकर मॅडम, नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक रमेश सोनकांबळे, परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश भोंडवे, लातुर येथील रुग्णालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी अनिल मस्के, पाठ्य निर्देशिका नादिया मॅडम, परिचर्या महाविद्यालयाच्या कर्मचारी मुसळे सिस्टर, परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव शहरात गुंडाची दहशत :पोलिसाचा धाक संपला

## नशेत तर्रर होऊन पती पत्नीस मारहाण; दुकानाची नासधूस, रस्त्याने चालणारांनाही फायटर ने मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात एक दिवसाआड दोन गटात फिल्म स्टाईल मारामाऱ्या, व्यापऱ्याना छोट्या मोठ्या गोष्टीसाठी दुकानाची तोडफोड, मारामारी आशा घटनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पोलिसाचा धाक संपला असल्याचे जाणवत आहे.दि ०९ मे गुरुवार रोजी शहरातील हनुमान चौक,दबडगावकर कॉलनी याठिकाणी विविध गुन्ह्यात जामीनवर असणारे दोन आरोपीनी नशेत तर्रर असताना रस्त्यावरून जाणाऱ्यां काही युवकांना,घरासमोर उभ्या पती पत्नीस, तसेच संजय एजन्सी या मेडिकल दुकानात घुसून दुकानातील युवकांना फायटर या शस्त्रने मारहाण केल्याची घटना घडली या प्रकरणी शहर पोलिसात दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखळ करण्यात आला.

याबाबत अंनत सदाशिव विभुते वय ३८ वर्षे व्यवसाय मजुरी रा. जिजामातानगर माजलगाव याने दिलेल्या फिर्यादित राधेशाम जेथलीया यांचे संजय एजन्सी येथे दिनांक ०९ मे गुरुवार रोजी सांयकाळी अदाजे ५:०० ते ५:३० वाजता काम करत आसतांना अचानक दोन अनओळखी इसम दुकानाध्ये घुसले व दोघांनी लोखंडी स्टुल उचलले व डोक्यात मारले असल्याचे तसेच त्यापैकी एकाचे हाताचे बोटामध्ये लोखंडी फायटर होते.त्यांने फिर्यादीच्या डाव्या हाताचे मंनगटाचे जवळ फायटर मारले व दुखापत केली तसेच त्या दोघांनी मिळून संजय एजन्सी या दुकानातील कॉप्युटर व प्रींटर फोडले व मालाची नासधूस केली तसेच दुकानातील चैतन्य सदाशीव आरदड यास ही दुकानाचे ओट्यावर असतांना त्या दोघांनी डोक्यात व पोटात फायटरने मारले व दुकानातील कामगार अर्जुन अनभुले याचा मोबाईल त्या दोघापैकी एकाने घेतला व फोडला. त्यानंतर फिर्यादी लगेच पोलीस स्टेशनला पळत आला.तेवढ्यात मागे फिर्यादीच्या ओळखीचा वर्धमान कांतीलालजी लोढा रा. मेन रोड माजलगाव हा देखील पळत आला त्याला पण अनोळखी दोन इसमाने रस्त्यावर मारहाण करुन त्याचे जवळील विवो वाय-१६ हा मोबाईल काढुन घेतला असल्याचे त्याने सांगितले तसेच वर्धमान याने सांगितले की, ज्या इसमानी मला मारहाण करुन माझा मोबाईल काढुन घेतला आहे त्यातील एक जन राजस्थानी मंगल कार्यालयाच्या बाजुला राहत असुन त्यापैकी एकाचे नाव बबलु भंगारवाला आसुन एकाचे नाव माहिती नाही असे सांगितले. वर्धमान कांतीलालजी लोढा याचे पाठोपाठ एक अनोळखी इसम ही पळत आला त्याचे डोळ्याचे बाजुला मार लागुन जखम होवुन रक्त निघत आसलेले दिसले त्यानंतर त्यांनी त्याचे नाव संतोष भागाअप्पा जामकर रा. दबडगावकर कॉलनी असे असल्याचे सांगीतले व त्यांना ही घरासमोर पती पत्नी बोलता असताना दोन अनोळखी इसमाने विनाकारण हातातील फायटरने तोंडावर मारुन रक्त काढुन जखमी केले व मारहाण केली असल्याचे सांगितले. फिर्यादी व दुकानातील कामगार यांना मारहाण करणारे इसम हे दुकानातील सिसीटिव्ही मध्ये दिसत आहे. तसेच दीनदयाळ बँकेचे ओमकार जाब्रास यांना पण गाडीवर बसताना याचं युवकांनी मारहाण करण्यात आली असल्याचे समजले. सी सी ती व्ही फुटेज मधील दुसरा आरोपी सोन्या दराडे हा असल्याची पोलिसांना ओळख पटली असून दोन्ही आरोपी अट्टल गुन्हेगार असल्याचे कळते. याचं आरोपीनी पळून जाताना शिवप्रताप मंगल कार्यालय समोर आडे यांच्या चारचाकीला धडक देऊन त्यांचे ही नुकसान केले व जखमी झाले असता यातील दराडे नमक आरोपीस ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.सदर आरोपीवर कलम ३२४,४५२ नुसार गुन्हा दाखल झाला असून पयढील तपास पोलीस महादेव तोटेवाड हे करत आहेत.

पान ६ वरून...

### आगामी पाच वर्षात बीड

पद्धत वेगळी असते जसं आपलं घर आपण स्वच्छ करावं तसंच मी मंत्री असताना बीड जिल्ह्यात काम केले. मुंडे साहेबांची आठवण तुम्हाला होईल असेच काम मला भविष्यातही करायचे आहे.देशाच्या सर्वोच्च सभागृहात जाण्यासाठी ही निवडणूक आहे, त्यामुळे बुद्धिभेदाला जागा देऊ नका. मराठा समाजाला पहिल्यांदा आरक्षण देण्याचे काम भारतीय जनता पक्षाने केले आहे, मात्र न्यायालयात ते आरक्षण टिकले नाही परंतु आता सरकारने पुन्हा मराठा समाजाला आरक्षण दिले आहे. त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका. शिक्षण, नोकरी, रोजगार, पाणी, परिसराचा विकास, चांगले रस्ते, आरोग्य यासह विकासाच्या मुद्द्यावर आपण सातत्याने काम करत आलो आहोत. म्हणूनच येत्या चार दिवसात झोकून देऊन काम, करा विजय आपलाच आहे. सालगडी जसा काम करतो तशी मी तुमच्यासाठी काम करीन असा शब्द देतानाच नेकनूर येथे आगामी काळात आपले संपर्क कार्यालय उघडणार असल्याचेही याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे असेही त्या म्हणाल्या.

विरोधकांकडे दुर्लक्ष करा

सोशल मीडियावर काही जण ट्रोल करत जातीवादाचा मुद्दा पुढे आणत आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. मराठा आरक्षणाचा विषय स्वतःचा मुखवटा घेऊन विरोधक लोकांना मत मागत आहेत. आधी त्यांच्याकडे कोणताच मुद्दा नव्हता, असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

### अशोक हिंगे पाटील यांच्या

आले आहे यामुळे अंबाजोगाई शहरात काही वेळासाठी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते संतापलेले पाहायला मिळत होते मात्र यावर लवकरात लवकर पोलीस प्रशासनाने या समाजकंटकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते हे करत आहेत अन्यथा जशास तसे उत्तरही आम्ही देऊ शकतो असंही यावेळेस भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

### आण्णांच्या नेतृत्वाखाली

यांच्या प्रचारार्थ घरोघर जाऊन मतदारांना विनंती केली . यावेळी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष दादासाहेब गिरी, नगरसेवक राम पवार, प्रकाश उपळकर विलास गुंजाळ सतीश पवार आप्पासाहेब मोरे रजित कांबळे बप्पा धनवटे बालाजी जाधव राजेंद्र तापडिया शेख बाबा दाऊद पठाण समाधान मस्के दिलीप सोनवणे शेख नसीर पिंटू साळवे शेख इर्शाद शौकत पठाण रवी मामडे राहुल मामडे सखाराम बाजोड नारायण पवार रोहिदास पवार प्रकाश बर्डे भारत बर्डे सय्यद रफिक अर्जुन चव्हाण दत्ता चव्हाण प्रभाकर भालशंकर अर्जुन बोराडे अर्जुन सोनटक्के संतोष सोनटक्के भाऊसाहेब बेदरे अनिल खांडेकर लाला सूर्यवंशी साईनाथ पाटोळे दिनकर सुतार प्रभाकर सुतार शेख मुददशीर,आदिनी परिश्रम घेतले आहेत तर आभार प्रकाश उपळकर यांनी मानले आहेत यावेळी कार्यकर्त्यांसह मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्याचे युवक कल्याण मंत्री

मोदी यांच्या निवासस्थानी माजी नगरसेवक महादेव आदमाने, खालेद चाऊस,धम्मा सरवदे, सुनील वाघाळकर, कचरूलाल सारडा, संतोष शिनगारे, दिनेश भराडीया यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या भेटीदरम्यान ना संजय बनसोडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी उभयतांमध्ये विस्तृत अशी चर्चा झाली. बीड जिल्ह्यात पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. हे वातावरण असेच टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी मेहनत घेणे गरजेचे असल्याचे ना संजय बनसोडे यांनी या भेटीदरम्यान सर्व कार्यकर्त्यांना सांगितले. राजकिशोर मोदी हे आपल्या सहकाऱ्यांसह चांगले काम करीत आहेत. त्यांनी संपूर्ण अंबाजोगाई शहर अक्षरशः पिंजून काढले आहे. शहरातील प्रत्येक भागात कमळ पोचविण्यासाठी मोदींनी मेहनत घेतली आहे. त्यामुळे शहरातून पंकजा मुंडे यांना नक्कीच मताधिक्य मिळेल असा विश्वास देखील यावेळी ना संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. या भेटी दरम्यान दत्ता सरवदे, रमेश गायसमुद्रे, उज्जेन बनसोडे, महेबूब गवळी, विशाल पोटभरे, माऊली मांदळे, अस्लम शेख, संतोष चिमणे, शरद काळे , अमोल मिसाळ यांच्या सोबतच इतर अनेकजन उपस्थित होते.

### लोकसभा निवडणुकीवर

चौकशी केल्याच्या कारणावरून गावगुंडांनी तांड्यावर हल्ला करून घरादाराचे नुकसान करत प्रचंड मारहाण केली.तांडावर असलेल्या जिल्हा परिषद शाळेची झालेले दुरवस्था, पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची होणारी वन वन, आदी नागरी प्रश्न सोडविण्यात आलेले नसल्याने संपूर्ण तांड्यावरील मतदारांनी दि १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घातलेला आहे. या निवेदनावर सचिन राठोड ,रवी राठोड, अनिल राठोड, नितीन राठोड, शंकर राठोड, रणजीत राठोड, गणपत राठोड, राहुल राठोड, जालिंदर राठोड, पापा राठोड, संजय राठोड, अशोक राठोड, राजेभाऊ राठोड, गोविंद राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पंकजाताई सारख्या

पंकजाताई मंत्री असतांनाच कर्तृत्व पाहिल्यास व त्यांना जनतेने ताकत दिल्यास मराठवाड्यातुन पुन्हा एक मोठे ताकतवर नेतृत्व उभा राहणार आहे.त्यांच्याकडे कर्तृत्व, नेतृत्व व वक्तृत्व या सर्व गोष्टी आहेत.त्यांची दिल्ली पर्यंत थेट लाइन आहे.या ओळखीचा फायदा जिल्ह्याला होणार आहे.या नेतृत्वाला ताकत देण्याची हीच खरी वेळ आहे.

विरोधी लोकांकडे मुद्दा नसल्यामुळे ही नेते मंडळी संविधान बदलाची भाषा बोलत आहेत, मुस्लिम बंधवांच्या मनात काहीतरी सांगून भीतीचे वातावरण निर्माण करत आहे.स्व.मुंडे साहेब,पंकजाताई व प्रितमताई यांनी कोणत्याही जाती धर्माला विरोध केला नाही. म्हणून बुद्धिभेद करणाऱ्या लोकांपासून सावध राहून आपला फायदा कशात आहे, याचा विचार करुण,पंकजा ताईंना जास्तीत जास्त मतांनी विजयी करा असे आवाहन भाजपा शिरूर तालुका सरचिटणीस इंजि.एम.एन.बडे यांनी केले आहे.

# ऊस दर देण्यात गुजरात ठरला महाराष्ट्रापेक्षा अव्वल!

पुणे : ऊस दराच्या बाबतीत महाराष्ट्रापेक्षा गुजरात राज्यातील साखर कारखाने कायमच अव्वल असलेले आतापर्यंत दिसून आले आहे. नुकत्याच संपलेल्या उसाची खरेदी किंमत गुजरातच्या कारखान्यांनी जाहीर केली असून, महाराष्ट्रातील कारखानदारांसाठी तो एक प्रकारचा धडाच आहे.

गुजरातमधील सहकारी साखर कारखान्यांनी २०२३-२४ हंगामात गळीतासाठी दिलेल्या शेतकऱ्यांच्या उसाला अव्वल दर देत तेथील गणदेवी येथील सहकार खांड उद्योग लि. या साखर कारखान्याने एप्रिल २०२४ मध्ये आलेल्या उसाला एकूण तोडणी वाहतूक खर्च धरून ४,६७५ रुपये प्रतिटन दर देण्याचे जाहीर केले आहे. प्रतिटन ७७० रुपये तोडणी वाहतूक खर्च वजा करता ३९०५ रुपये दर ते देणार आहेत. केवळ ११.४७ टक्के रिकव्हरी असताना ९ लाख, १४ हजार ४९९ टन उसाचे गाळप करत १० लाख, ४८ हजार, ३३० क्विंटल साखर उत्पादन केल्याची माहिती सहकारी साखर मिल असोसिएशनच्या वतीने देण्यात आली.



गणदेवी कारखान्याने मार्च ३,८०५ रू. व फेब्रुवारी २०२४ करता ३७०५ रुपये प्रतिटन तसेच जानेवारी २०२४ सह डिसेंबर, नोव्हेबर, ऑक्टोबर २०२३ या चार महिन्यांत आलेल्या उसाला ३६०५ रुपये टन याप्रमाणे दर देण्याचे जाहीर केले आहे. हा दर तोडणी, वाहतूक खर्च वजा करून शेतकऱ्यांना मिळणारा दर आहे. बोर्डली साखर कारखान्याची रिकव्हरी १०.८३ टक्के आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २३ व जानेवारी २४ मध्ये आलेल्या उसाला ३४२३ रू., तर फेब्रुवारी, ३५२३, मार्च ३६२३ रुपये टनांप्रमाणे निव्वळ दर 'गणदेवी' देणार आहे. गुजरातप्रमाणे महाराष्ट्रातील कारखान्यांनी दर द्यावा अशी शेतकरी संघटनांची मागणी आहे.

### ऊस दरात प्रचंड तफावत

गुजरात राज्यातील ऊस दर पाहता ते दरात अव्वल ठरले आहेत. तसेच गेल्या १७ वर्षांतील महाराष्ट्र व गुजरातच्या ऊस दरातही प्रचंड तफावत आहे.

## एक जूनपासून जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी इअर टॅगिंग बंधनकारक




शेतकरी आणि दुग्ध व्यवसाय यांचा खूप जवळचा संबंध आहे. मात्र, दुग्ध व्यवसायात 'इअर टॅगिंग' केल्याशिवाय कोणत्याही सरकारी योजना किंवा लसीकरण सेवेचा लाभ मिळत नाही. अशातच आता केंद्र सरकारच्या निर्देशानुसार १ जून २०२४ पासून 'इअर टॅगिंग' केल्याशिवाय पशुधनाची खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. अर्थात शेतकऱ्यांच्या पशुधनाची नोंद 'भारत पशुधन प्रणाली'वर असल्याशिवाय शेतकऱ्यांना आपल्या खरेदी किंवा विक्री करता येणार नाही. असे सरकारी पातळीवरून सांगितले जात आहे.

केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने 'नॅशनल डिजिटल लाइव्ह स्टॉक मिशन'अंतर्गत 'भारत पशुधन प्रणाली' कार्यान्वित केली आहे. या प्रणालीत 'इअर टॅगिंग'ची नोंद घेण्यात येत आहे. यात जन्म-मृत्यू नोंदणी, प्रतिबंधात्मक लसीकरण व औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण यांचा समावेश आहे. त्यामुळे या गोष्टींसाठी यापुढे 'इअर टॅगिंग' बंधनकारक असणार आहे, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

बाजार समित्यांची जबाबदारी : दरम्यान, 'इअर टॅगिंग' नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडा बाजार व गावागावातील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे 'इअर टॅगिंग' नसलेले पशुधन बाजार समितीत आणले जाणार नाही व त्यांची खरेदी-विक्री होणार नाही, याची जबाबदारी संबंधित बाजार समितीने घ्यायची आहे.

पशुधनाच्या मालकी हस्तांतरण बाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अद्ययावत करून घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकांची राहणार आहे. असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

कधी मिळणार नुकसान भरपाई ? : शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक मृत पावलेल्या जनावरांना नष्ट केल्यास, पशुधनाची 'इअर टॅगिंग व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय त्यांना केंद्र व राज्य सरकारकडून देय आर्थिक साहाय्य मिळणार नाही. नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास 'इअर टॅगिंग' केलेली नसल्यास भरपाईची रक्कम मिळणार नाही. पशुधनाची वाहतूकही करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

## जुन्या आंबा बागेचे 'असे' करा पुनरुज्जीवन



आंब्याची झाड जसजशी मोठी होतात, त्याचा विस्तार वाढतो. सूर्यप्रकाश, हवासुध्दा खेळती राहत नाही. त्यामुळे फलधारणा झाडाच्या शेंड्यालगत होत नाही, आंब्याचे उत्पादन कमी होते. अशा जुन्या झाडांवर बांडगुळे मोठ्या प्रमाणात वाढतात, त्यामुळे फांद्यांना अन्नपुरवठा कमी होऊन ती सुकतात. १० वर्षापेक्षा मोठी असलेल्या आंब्याच्या झाडांची वेळोवेळी छाटणी करून झाडाचा विस्तार आटोपशीर व मर्यादित ठेवून पाने व फांद्या अधिक सशक्त व जोमदार बनविणे गरजेचे असते यालाच आंब्याचे पुनरूज्जीवन करणे असे म्हणतात. डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाने आंबा बागांचं पुनरूज्जीवन करण्याची शिफारस केली आहे. जाणून घेऊ या आंबा पुनरूज्जीवन कसे करायचे याविषयी.

असे करा व्यवस्थापन : झाडाच्या मध्ये फांदीची छाटणी करावी. तसेच मोठ्या झाडाच्या एक तृतीयांश फांद्यांची छाटणी करावी. छाटणी केलेल्या फांद्यावर येणाऱ्या पालवीचे काटेकोरपणे नियोजन करावे. खोडकिडा व इतर रोगांपासून संरक्षण करावे. झाडांना लागणाऱ्या अन्नद्रव्यांचे योग्य व्यवस्थापन करावे. संजीवकांचा योग्य प्रकारे वापर करावा. गरजेनुसार पाणी द्यावे. फळगळतीचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे. झाडांची छाटणी शक्यतो ऑक्टोबर किंवा मार्च महिन्यात करावी. शक्यतो ज्या झाडांपासून कमी उत्पादन मिळते, ज्या बागेतील झाडे खूप उंच वाढली आहेत, त्या बागांमध्ये फवारणी, फळांची काढणी इत्यादी काम निटपणे करणे अवघड झाले आहे, तसेच शास्त्रीय वाढ अत्यंत घट्ट झाल्यामुळे सूर्यप्रकाश झाडातील आंतील भागापर्यंत पोहोचत नाही, अशा बागा निवडाव्यात. डोंगरउतारावर वसलेल्या बागांमध्ये रोग आणि किडीचा प्रादूर्भाव दरवर्षी मोठ्या प्रमाणावर होतो. फवारणी करूनही तो आटोक्यात येत नाही. अशा बागा पुनरूज्जीवनासाठी योग्य असतात. शिवाय ज्या बागांमधील झाडे अशक्त आहेत, झाडांच्या फांद्या वाळण्याचे प्रमाण वाढले आहे, आणि उत्पादकता कमी झाली आहे, अशा बागांचे पुनरूज्जीवन करणे आवश्यक आहे. तसेच ज्या बागांमध्ये योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापन झालेले नाही आणि पीक संरक्षण उपाय योजना केलेल्या नाहीत, अशा उत्पादकता अत्यंत कमी झालेल्या बागा पुनरूज्जीवनासाठी योग्य असतात. निकषानुसार छाटणीसाठी योग्य झाडांची निवड करावी लागते. सर्वसाधारणपणे तिसऱ्या वाढीव फांद्यांची छाटणी करावी. ज्यांची छाटणी करायची आहे त्या फांद्यावर योग्य उंचीची खूण करावी. जुन्या आणि उंच झाडांची छाटणी बुंध्यापासून दोन तृतियांश उंचीवर करावी. कमी वयाच्या आणि कमी उंचीच्या झाडांची छाटणी १२ ते १५ फूट उंचीवर करावी. कमी उंचीवरील फांद्यांची छाटणी चेन सॉ किंवा करवतीने करावी. उंच फांद्याची छाटणी करण्यासाठी पोल प्रूनरचा वापर करावा. छाटणी करताना काप तिरका असावा, जेणेकरून त्यावर पावसाचं पाणी थांबणार नाही.

छाटणीनंतरची काळजी : छाटणी केलेल्या बागेतल्या फांद्या गोळा करून बाग स्वच्छ करावी.

छाटणी केलेल्या झाडांवर क्लोरोपायरीफॉस हे कीटकनाशक ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारून संपूर्ण झाड भिजवून घ्यावे. झाडे भिजवून झालेनंतर एक लिटर ब्लॅक जपान डांबरामध्ये कार्बेन्डेझिम २.५ ग्रॅम भुकटी मिसळून ते कापलेल्या फांद्यांच्या टोकाशी लावावे. तसेच क्लोरोपायरीफॉसचे द्रावण छाटणी केलेल्या झाडांना सुरुवातीला पाणी द्यावे. प्रत्येक झाडाला १० ते १५ दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. छाटणी केलेल्या खोडाच्या भागावर ३/५ फुटवे ठेवून बाकीचे फुटवे काढून टाकावेत.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन : भारत.
### मातृत्व दिन

### महत्वाच्या घटना

१५०२ : ख्रिस्तोफर कोलंबस आपल्या ४ थ्या आणि अखेरच्या सफरीवर वेस्ट इंडिज बेटांकडे निघाला.
१८११ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा एका चिनी दांपत्याच्या पोटी जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी १८७४)
१८५७ : पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम स्वातंत्र्यसैनिकांनी दिल्ली शहर जिंकले.
१८५८ : मिनेसोटा अमेरिकेचे ३२ वे राज्य झाले.
१८६७ : लक्झेंबर्गला स्वातंत्र्य मिळाले.
१८७८ : महाराष्ट्रातील पुणे शहराच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले होते. यालाच अखिल भारतीय साहित्य संमेलन म्हणून संबोधले जाते.
१८८८ : ज्योतिबा फुले यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली.
१९२० : स्त्रियांना पदवीपरीक्षेसाठी प्रवेश देण्याचा ऑक्सफर्ड विद्यापिठाचा निर्णय.
१९२७ : चलत चित्र कला व विज्ञान अकादमीची स्थापना. ही संस्था दरवर्षी ऑस्कार पुरस्कार बहाल करते.
१९४९ : इस्त्रायलचा संयुक्त राष्ट्रांत समावेश झाला.
१९४९ : सियाम या देशाने अधिकृतरीत्या दुसऱ्यांदा आपले नाव बदलुन थायलंड केले.
१९५१ : गझनीच्या महंमदने उध्दवस्त केलेया बारा ज्योतिर्लिंगापैकी एक सोमनाथ या मंदिरात शिवलिंग प्रतिष्ठापना डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाली.
१९८७ : गोव्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला.
१९९६ : माउंट एव्हरेस्ट आपत्ती: एकाच दिवसात माउंट एव्हरेस्टच शिखर चढणाऱ्या ८ लोकांचे निधन झाले.
१९९८ : २४ वर्षांनंतर भारताने पुन्हा राजस्थानच्या वाळवंटातील पोखरणच्या परिसरात हायड्रोजन बॉम्बनिर्मितीसाठीच्या साधनासह तीन यशस्वी आण्विक चाचण्या केल्या.
१९९८ : राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन
१९९९ : टेनिस सम्राज्ञी स्टेफी ग्राफ हिने जर्मन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील १,००० वा सामना खेळण्याचा एक वेगळा विक्रम प्रस्थापित केला

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९५ : जे. कृष्णमुर्ती, भारतीय तत्त्वज्ञानी.
१९०४ : स्पॅनिश चित्रकार साल्वादोर दाली यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९८९)
१९१२ : भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि पटकथालेखक सादत हसन मंटो यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९५५)
१९१४ : संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री ज्योत्स्ना भोळे यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २००१)
१९१८ : क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स मधील मूलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे अमेरिकन पदार्थवैज्ञानिक रिचर्ड फाइनमन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९८८)
१९४६ : कृत्रिम हृदय विकसित करणारे कार्डियोलॉजिस्ट रॉबर्ट जार्विक यांचा जन्म.
१९५० : सुप्रसिद्ध भारतीय हिन्दी-मराठी चित्रपट अभेनिते सदाशिव दत्ताराय अमरापूरकर यांचा जन्मदिन.
१९६० : अभिनेता सदाशिव अमरापूरकर यांचा जन्म.
१९७२ : जेकब मार्टिन, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल अ‍ॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे संस्थापक सर जॉन विल्यम हर्षेल यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १७९२)
१८८९ : जॉन कॅडबरी, इंग्लिश उद्योगपती.
१८८५ : लोकनेते कृष्णमोहन बंदोपाध्याय.
१९९३ : शाहू मोडक, अभिनेते.
२००४ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचे निधन. (जन्म: २७ मे १९१३)
२००९ : भारतीय नौसेनाधिपती सरदारिलाल माथादास नंदा यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९१५)

# खरीपातील कापूस लागवडीचे नियोजन

अक्षय तृतीयेपासून पुढे पेरणीसाठी जमीन तयार करतांना कमीत कमी तीन पाळ्या दिल्या जातात. शेवटची पाळी देखील ठरलेली असते. ही पाळी दक्षिणोत्तर घातली जाते. कारण खरीपाची पेरणी ही पुर्व- पश्चिम करावयाची असते. मराठवाडा, विदर्भ आणि आता पश्चिम महाराष्ट्रामध्ये नगदी पिक म्हणून कापूस लागवडीकडे कल वाढल्याचे दिसून येते. हा कल वाढण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे ऊसानंतरचे नगदी पिक म्हणून कापूस पिकाकडे पाहिले जाते. कापसाच्या उत्पादनावर पुढील वर्षाचे व्यवहार ठरतात. कापसाचे पैसे आले की, लगीनसराई जोरात होते. दैनंदिन व्यवहारामध्ये चलन फिरते राहते. इतर पिकांची उत्पदकता कमी असल्यामुळे व तात्काळ पैसा देणारे पिक असल्यामुळे या पिकाचे महत्त्व मोठे आहे.




हवामान : कापूस पिकास संपूर्ण हंगाम कालावधीमध्ये ५०० ते ६०० मीमी पाऊस लागतो. पेरणीच्यावेळी ७५ ते १०० मीमी पाऊस व बियाणे उगवणीसाठी १५ अंश सेल्सिअस तापामानाची आवश्यकता असते. रोप अवस्थेत शारीरीक वाढीसाठी २१ ते २८ अंश सेल्सिअस गरज असते. कपाशीच्या झाडांना फुले येण्याकरिता दिवसाचे २४ ते २८ अंश सेल्सिअस आणि रात्रीचे तापमान २० ते २१ अंश सेल्सिअस लागते. रात्रीचे तापमान २४ अंश सेल्सिअसचेवर व दिवसाचे तापमान ३० अंश सेल्सिअसचेवर गेल्यास फुले व पाते गळण्याचे प्रमाण वाढते. यामुळे आपल्या परिसरातील तापमानाच्या त्या त्या कालावधीतील चढ-उतारावर शेतकऱ्यांनी लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. जमीन : कापूस लागवडीसाठी जमीन निवडतांना काळी जमीन निवडली गेली पाहिजे. परंतु बागायती कापूस लागवडीसाठी मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, ७ ते ८ पीएच आणि १% पेक्षा जास्त सेंद्रिय कर्ब असलेली जमीन निवडावी. मात्र हंगामातील कापूस लागवडीसाठी मध्यम ते भारी जमीन योग्य असते. पूर्व हंगामी कापूस लागवड मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होत असल्यामुळे जास्त हलक्या जमिनीमध्ये किंवा खोल काळीच्या जमिनीत या पिकाची लागवड केल्यास पाणी व्यवस्थापनामध्ये अडचणी निर्माण होवू शकतात. म्हणून जमिनीची योग्य निवड याग्य पद्धतीने होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.जमिनीची पूर्वतयारी : खोल नांगरट, कुळवाच्या ३-४ पाळ्या देवून जमीन भूसभूशीत करावी. या पिकाच्या मुळ्या खोल जात असल्यामुळे हे करणे आवश्यक आहे. कापूस लागवडीपूर्वी शेवटची पाळी देतांना ती पूर्व-पश्चिम अशीच द्यावी. कारण या पिकाची दाटीची लागवड करतांना ती दक्षिणोत्तर होते. शेवटच्या पाळीपूर्वी एकरी ८-१० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात मिसळावे. कपाशीच्या पऱ्हाटीपासून बायोडायनॅमिक पद्धतीने तयार केलेले खत या पिकास वापरल्यास पिकाची सुक्ष्ममुलद्रव्यांची गरज भागवण्यास मदत होते. कोळपट किंवा न नांगरलेल्या शेतात कपाशीची लागवड करू नये. कारण पाण्याचा किंवा पावसाचा थोडाही ताण पडल्यास अशा जमिनीतील कपाशीचे उत्पादन घटते हे सिद्ध झालेले आहे. त्यामुळे नांगरट केलेल्या जमिनीतच शक्यतो कापूस पिकाची लागवड करावी. पूर्वीचे पिक गहू असेल तर उत्तमच. नसता एकरी एक ते दीड ट्रॉली गव्हाचे काड शेतात मिसळल्यास जमिनीला ताणाच्या काळात भेगा पडत नाहीत. पर्यायाने ओल उठण्याचे प्रमाण कमी होते. लागवडीची वेळ : पूर्व हंगामी कापसाची लागवड करतांना आपण वेळेचा विचार कधी केल्याचे दिसून येत नाही. मग अक्षय तृतीयेपासून ते मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत आपण लागवड करत असतो. या विषयावर चर्चा व्हावी म्हणून कपाशीच्या झाडाच्या शरीरशास्त्राचा या ठिकाणी आपण आधार घेणार आहोत. काही थोड्या जाती वगळता इतर सर्व जातींमध्ये कपाशीच्या झाडास लागवडीपासून ३० ते ३५ दिवसांत पाते, ५० ते ५५ दिवसांत फुले, ९० दिवसांत बोंडे तयार होणे आणि १२० दिवसांत बोंडे फुटून कापूस वेचणीस येतो. जर १ ते १० मे या काळात कपाशीची लागवड केल्यास त्याची बोंडे फुटण्याची अवस्था ही साधारणपणे १ ते १० सप्टेंबर दरम्यान येते. मराठवाडा व विदर्भ भागात ऑगस्ट आणि सप्टेंबर हे हमखास पावसाचे महिने म्हणून गणले जातात. त्यातल्या त्यात मराठवाडा विभागात परतीचा मान्सून मोठ्या प्रमाणावर येतो हे नक्की. मग यावेळी एकतर पावसामुळे बोंडे सडण्यास सुरूवात होते. फुटलेली बोंडे पावसात सापडल्यामुळे मोठे नुकसान होते आणि सुरूवातीस लागलेली चांगली व मोठी बोंडे खराब झाल्यामुळे उत्पादनावर फार मोठा परिणाम संभवतो. म्हणून पूर्व हंगामी कपाशीची लागवड २० मे नंतरच करावी. त्या अगोदर करू नये.

# महावितरणने मान्सुनपुर्व विजेची देखभाल व दुरूस्तीची कामे करावी

बीड:पावसाळ्यात वीजग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा याकरिता बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची रोहित्रांची तपासणी,अर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी,लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता महावितरण विभाग बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेतील बहुतांश सामग्री उघड्यावर असल्याने वातावरणात होणा-या बदलांचा प्रतिकूल परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होत असतो पर्यायाने त्याचा परिणाम परीणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होत असतो.यामुळे उन्हाळा, अवकाळी पाऊस व त्यानंतर लगेचच सुरू होणारा पावसाळा हा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने सैल झालेले गार्डींग





व स्पन घट्ट करणे,दोन खांबामधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे,सर्व खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करणे अपेक्षित आहे.वीज रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे, स्टे वायरने वीजखांबांचा आधार मजबूत करणे,रोहित्रांचे अर्थिंग मजबुत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे अर्थिंग सुस्थितीत करणे, वीज तारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे ,फुटलेले पिन आणि इन्सुलेटर बदलणे, तपासणी व दुरुस्ती करणे,वाहिन्यांचे खराब झालेले लाइटनिंग अरेस्टर बदलणे, भुमिगत वाहिन्यांचे तात्पुरते असलेले जाईंट कायमस्वरूपी करणे, वाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदलणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे , पावसाचे पाणी साचणा-या परीसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढवणे आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

बहुतांश रोहित्र उघड्यावर असुन त्यांना संरक्षक कवच नसल्याने पावसाळ्यात निर्माण झालेला हिरवागार चारा चरण्यासाठी आलेली जनावरे विद्युत प्रवाहाचा धक्का लागुन दगावल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. तसेच लोंबकळणा-या तारांमुळे अपघाती घटना घडलेल्या आहेत त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील रोहित्रांची अत्यंत दुरावस्था असुन महावितरण कडुन आवश्यक साहित्य पुरवण्यात येत नसल्याने ग्रामस्थांनाच रात्री अपरात्री वीज गेल्यावर फ्युज टाकावे लागते. महावितरणचे कर्मचारी यांना सुद्धा हॅन्ड ग्लोज तसेच ईतर आवश्यक साहित्य मिळत नसल्याचे वास्तव आहे.त्यामुळे महावितरणने आवश्यक साहित्य पुरवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

## महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा फार मोठा प्रभाव आहे-जयदत्त क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

महात्मा बसवेश्वराचे विचार सर्व समाजाला मार्गदर्शन करणारे आहेत त्यांच्या तत्त्वज्ञानाचा, विचारसरणीचा व कार्याचा फार मोठा प्रभाव विविध महाराष्ट्रीय धर्म सांप्रदायावरही तेराव्या शतकापासूनच पडला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. शहरातील पेठ बीड भागात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी रामेश्वर आप्पा कानडे, राणा चौहाण, प्रकाश कानगावकर, सतपाल लाहोट यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी समतेचा विचार समाजात रुजविला त्यांनी वीर शैव समाजावरच नवे तर पूर्ण देशात अध्यात्मावर सर्व समाजाला मार्गदर्शन करून जाती तोडा आणि समाज जोडा असा संदेश दिला १२ व्या शतकात आंतरजातीय विवाह घडवून आणून त्यांनी समाजाची मानसिकता बदलली महात्मा बसवेश्वराचे विचार आजही तेवढेच तलक आणि ताजे आहेत. वीर शैव समाज हा कष्टकरी आहे कष्टाने जगण्याची प्रेरणा महात्मा बसवेश्वराच्या विचारात आहे. स्त्री शक्तीला आदर देण्याचा विचार महात्मा बसवेश्वराचा आहे. जुन्या नव्यांची सांगड घालण्यासाठी त्यांचे विचार कामाला येतील. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी स्त्री- पुरुष समानतेचे रणसिंग फुंकले असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी शिवाप्पा भुरे, संजय घाळे, बाबुराव चिपाडे, अनिल आप्पा मिटकरी, शैलेश कानडे, दगडू आप्पा म्हेत्रे, राजेंद्र आतकरे, दत्ता शेटे, अक्षय शेटे, विद्याभूषण बेदरकर यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

## शिवसंग्रामच्या बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ . ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसंग्रामचे प्रदेशाध्यक्ष मा. तानाजीराव शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद यांनी शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी श्री सुहास पाटील यांची तर प्रा.सुभाष जाधव यांची विधानसभा प्रमुखपदी निवड केली. शिवसंग्राम परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या .

शिवसंग्राम संघटनेच्या स्थापनेचे साक्षीदार असणारे निष्ठावंत कार्यकर्ते लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांचे खंदे समर्थक, माजी नगरसेवक तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक सुहास आबा पाटील यांची शिवसंग्राम बीड शहराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली.स्व.मेटे साहेबांचे सहकारी संघर्षाचे साक्षीदार तसेच आजपर्यंत मेटे परिवाराशी एकनिष्ठ असलेले सुहास आबा पाटील यांची नुकतीच प्रदेश कार्यकारिणी व शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण दादा काशीद यांनी बीड शहराध्यपदी त्यांची निवड केली आहे. प्रत्येक कार्यक्रमांमध्ये शहरातील सामाजिक -राजकीय - सांस्कृतिक - व्यावसायिक विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रत्यक्षपणे ओळख असणारे तसेच बीड शहरातील एक चांगले व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे .

त्यांच्या कार्याचा लेखाजोखा पाहता आज त्यांची बीड शहराध्यक्षपदी निवड करत शिवसंग्रामने त्यांना सन्मान केला . तसेच शिवसंग्रामचे प्रा.सुभाष जाधव सर यांची बीड विधानसभा प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. लोकनेते मेटे साहेबांच्या सामाजिक चळवळीचे साक्षीदार व बालाघाटावरील प्रतिथयश प्राप्त असणारे, समाजातील प्रत्येक घटकाशी मैत्रीपूर्ण संबंध असणारे व्यक्तिमत्व म्हणून प्रा. सुभाष जाधव सर यांची ओळख आहे.खऱ्या अर्थाने डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या माध्यमातून शिवसंग्रामला या निवडीने नवीन बळ मिळत आहे. नवीन जोमाने काम करण्यासाठी शिवसंग्राम आता सज्ज होत आहे.

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे प्रदेशाध्यक्ष मा. तानाजीराव शिंदे , ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, शहर प्रभारी अनिल घुमरे तसेच शिवसंग्राम परिवाराच्या वतीने सुहास पाटील व प्रा. सुभाष जाधव सर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## वैद्यकीय परिपूर्ती व थकित देयकांची रक्कम शिक्षकांच्या खात्यावर तात्काळ जमा करा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाकडे प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड ने तीन ते चार वर्षांपासून थकलेले वैद्यकीय परिपुर्ती देयके व सर्व प्रकारची थकित देयके अदा केली जावीत यासाठी दोन वर्षांपासून प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली पाठपुरावा केला होता. त्यानंतर शासनाकडून माहे फेब्रुवारी- मार्च २०२४ यासाठी लागणारा पुरेसा निधी जिल्हा परिषद,बीड ला दिला होता. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांना सदरील देयके ऑनलाईन पद्धतीने ई-कुबेर प्रणालीने तात्काळ अदा करण्याबाबत मा. संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय,पुणे यांच्या कडून ३० जानेवारी व१५ फेब्रुवारी २०२४ रोजी आदेश निर्गमित केले होते.

त्या अनुषंगाने मा. शिक्षणाधिकारी प्रा. यांनी २ फेब्रुवारी २०२४ व १३ मार्च २०२४ रोजी सर्व गटशिक्षणाधिकारी यांना सदरील वैद्यकीय परिपुर्ती देयके व थकित देयकांच्या रक्कमा ऑनलाईन पद्धतीने ई कुबेर प्रणालीने अदा करण्यात यावीत असे पत्र देखील निर्गमित केलेले आहेत. सदरील देयके अदा करण्याबाबतची सर्व कार्यालयीन प्रक्रिया पार पडल्यानंतर २७ मार्च २०२४ रोजी वैद्यकीय परिपूर्ती देयकांची आणि ३० एप्रिल २०२४ रोजी थकित देयकांची रक्कम जिल्हा परिषद बीड कडून सर्व अकराही तालुक्यांना वर्ग करण्यात आलेली आहे. परंतु वैद्यकीय परिपुर्ती देयकांच्या रक्कमेला दीड महिना व थकित देयकाच्या रक्कमेला आठवडा उलटून गेला आहे ,तरी वैद्यकीय परिपुर्ती देयकांच्या रक्कम अद्याप ही काही तालुक्यात शिक्षक बांधवांना प्राप्त झालेल्या नाहीत,ही बाब अत्यंत गंभीर व खेदजनक आहे. तसेच यानंतर थकित देयकांच्या रक्कमा तालुका स्तरावर प्राप्त होऊन आठवडा उलटला आहे, तरीही अकराही तालुक्यांत शिक्षक खात्यावर जमा झालेल्या नाहीत. वास्तविक पाहता,सदरील रक्कम दोन दिवसात शिक्षकांच्या खात्यावर वर्ग करणे आवश्यक व शक्य असतानाही, या अक्षम्य विलंब व हलगर्जी मुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवात तीव्र संतापाचे वातावरण आहे.संबंध जिल्ह्यातून प्रहार कडे याबाबत न्याय मिळवून देण्याची मागणी सातत्याने होत आहे.म्हणूनच याप्रकरणी लक्ष घालत प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा ने संबंधित वैद्यकीय परिपुर्ती देयके व थकित देयकांच्या रक्कमा तात्काळ शिक्षकांच्या खात्यावर जमा करण्यात यावी व सदरील विलबांची व ई कुबेर प्रणालीने सदरील रक्कम अदा का केले नाहीत याची चौकशी करण्याची मागणी निवेदनाद्वारे मा. शिक्षण संचालक, प्रा . शिक्षण संचालनालय पुणे,मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड व शिक्षणाधिकारी प्रा. यांच्याकडे केली आहे. सदरील रक्कमा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांच्या खात्यावर तात्काळ जमा न झाल्यास प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा परिषद शिक्षण विभागा समोर घंटानाद आंदोलन करणार आहे, अशी माहिती प्रहार कडून देण्यात आली आहे.



बीड :- शहरात महापराक्रमी वीर योद्धा महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

## गुरुवारपर्यंत ११५२ टपाली मतदान

बीड । प्रतिनिधी

रविवारपासून सुरू झालेले टपाली मतदान आज गुरुवार रोजी पर्यंत ११५२ इतक्या नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. याअंतर्गत २९ सर्विस मतदार, २ गृह मतदारांनी आणि सुविधा केंद्रतून पोस्टल बॅलेटद्वारे ५९ मतदारांनी मतदान केले.

आज गुरुवारी २९ सर्विस मतदारांनी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान केले. यासह ८५ वयोगटाच्या अधिकचे आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये ८५ वयोगटाच्या अधिक ०१ मतदाराने तर ०१ मतदार हे दिव्यांग होते. असे एकूण ०२ मतदारांनी गृह मतदान केले.

बीड विधानसभा मतदारसंघातील सुविधा केंद्रात ४७ आणि परळी विधानसभा मतदारसंघात ७ आष्टी विधानसभा मतदारसंघात ५ मतदारांनी पोस्टल बॅलेट द्वारे ५९ मतदारांनी मतदान केले. रविवारपासून टपाली मतदानाला सुरूवात झाली असून आजपर्यंत ११५२ मतदारांनी मतदान केले.

## बीड विधानसभा मतदारसंघात टपाली मतदान सुरु

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघात तहसील कार्यालयात तसेच अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालय परिसरात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी पोलीस कर्मचारी अथवा निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील परिसरात बीड जिल्ह्यातील इतर तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुविधा केंद्राद्वारे पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन पाहणी केली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी



उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी तथा टपाली नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यावेळी उपस्थित होते. बीड लोकसभा मतदारसंघात एकूण झालेले टपाली मतदानाची स्ट्राँग रूम या ठिकाणी आहे. सोमवार दिनांक १३ मे रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडल्यानंतर झालेले टपाली मतदान शासकीय तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात येणार आहे. दिनांक ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. यावेळी सर्वप्रथम टपाली मतदान मोजण्यात येईल. त्यानंतर विधानसभा मतदारसंघ निहाय मतमोजणी करण्यात येईल.

## भक्तीचे वर्म कळणारेच परमार्थाचे खरे मार्गदर्शक - सुरेश जाधव

बीड । प्रतिनिधी

भक्तीचे वर्म कळणारे संतच परमार्थातील खरे मार्गदर्शक असतात.. संत ज्ञानेश्वर माऊली दादांच्या हातात भक्तीचे वर्म होते त्यामुळेच त्यांनी परमार्थाची सुलभ सोपी वाट समाजाला दाखवली. असे प्रतिपादन श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी केले.. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे तपोनिधी संत बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत महादेव महाराज तात्या, श्री ह भ प प्रशांत महाराज क्षीरसागर,श्री ह भ प अमोल महाराज पवार,श्री ह भ प नानासाहेब काकडे पाटील, श्री ह भ प बिहानी शेठ, श्री ह भ प हनुमंत महाराज घोलप, यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.. यावेळी लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येकाने मतदान करावे असे आवाहन महाराजांनी केले..

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे श्री गुरु चैतन्य संत बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या सप्ताहात चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांनी गुंफले.. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या भक्तीचे ते वर्म जयाचिये हाती ! तया घरी शांती क्षमा दया !!



अष्टमहासिद्धी ओळंगती द्वारी ! नवजती दुरी दवडीता !! या अभंगावर चिंतन मांडताना परमार्थ असो किंवा संसार कोणतेही काम करताना त्याच वर्म माहित असणे आवश्यक आहे. वर्म माहीत नसताना केलेली कृती फजिती करणारी अवकाळा करणारी व अधर्म घडवून आणणारी असते. त्यामुळे अगोदर वर्म जाणुनच कोणतीही कृती करावी. तुका म्हणे वर्म जाणोनी ! करावे एक न घालावे एका वरी!! या प्रमाणाचा दाखला देत. जीवनामधील यश आणि अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडण्यापेक्षा यश मिळवण्यासाठी वर्म समजून घेणे गरजेचे आहे आणि जर एखाद्या गोष्टीच वर्म कळालेले असेल तर यश निश्चितच पदरात पडणार असे देखील महाराज म्हणाले. जीवनामध्ये लाभ मिळवायचा असेल फळ पदरात पाडून घ्यायच असेल तर. सायास, दैव आणि वर्म या साधन सामग्री महत्वाच्या असतात. साधुसंतांनी भक्ती करत असताना वर्म जाणून भक्ती करा अस मार्गदर्शन केलं आहे. भक्तीचे वर्म भाव आहे.. काही न लगे एक भावची कारण! तुका म्हणे आन विठोबाची!! असा अभंगाचा दाखला देत.. संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर दादांच्या हातामध्ये भक्तीच वर्म होतं म्हणून तर त्यांच्या दरबारात दया क्षमा आणि शांती या तिन्हीच वास्तव्य आहे.. अष्ट महा सिद्धी त्यांच्या दरबारातून दवडून लावायचा प्रयत्न केला तरी जात नाहीत.. माऊलींच्या जिवनात दृष्ट गुण कुठेही पाहायला मिळत नाही.. आणि श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये प्रत्यक्ष चैतन्य स्वरूप अखिल कोट ब्रम्हांडनायक भगवान पंढरीश पांडुरंगाचे वास्तव्य आहे.. तर चाकरवाडी मध्ये प्रत्यक्ष भगवान कुठल्या ना कुठल्या रूपामध्ये येऊन कामारी म्हणून काम करतो. म्हणूनच तर आजही चाकरवाडी मध्ये शांती आणि आनंदाची श्रीमंती आहे.असे देखील सुरेश महाराज म्हणाले.. या कीर्तनाला साथ साथ संगत श्रीक्षेत्र चाकरवाडी फळावरील सर्व टाळकरी गायकवाड मंडळी यांची उपस्थिती होती.. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य अविष्कार महाराज क्षीरसागर , मृदंग सम्राट गणेश महाराज भोसले, संगीत अलंकार राधाकृष्ण महाराज माखले, पिंपळे महाराज, नारायण बाबा, हाडे महाराज, रोडे महाराज यांच्यासह हजारो भावी भक्त कीर्तनामध्ये मंत्रमुग्ध झाले..

## ड्रामा स्कूलमुळे बीडच्या नाट्यक्षेत्रात उत्साह

बीड । प्रतिनिधी

तीस ते पस्तीस वर्षापासून नाट्यक्षेत्रात रचनात्मक काम करणाऱ्या परिवर्तन प्रतिष्ठान तर्फे बीड शहरात नाटकाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी ड्रामा स्कूल सुरू होत असून स्कूलच्या सर्टिफिकेट कोर्सला बीड शहरातील कलावंतांनी प्रचंड प्रतिसाद दिला असल्याची माहिती परिवर्तन ड्रामा स्कूलचे प्रमुख व प्रसिद्ध नाटककार आणि दिग्दर्शक डॉ. सतीश साळुंके यांनी दिली.

या ड्रामा स्कूल (नाट्य विद्यालय) करिता वयाची अट नाही. नाटक, रील तयार करणे, सिनेमा मालिकांमध्ये अभिनय करणे, वृत्त निवेदन, सूत्रसंचालन, भाषण करणे, आदिची आवड असणाऱ्या गृहिणी, शिक्षक- शिक्षिका, प्राध्यापक, डॉक्टर, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांना ही मोठी संधी उपलब्ध झाली आहे. ड्रामा स्कूल मध्ये राष्ट्रीय नाट्य विद्यालय(एनएसडी) दिल्ली, मुंबई विद्यापीठाचा नाट्यशास्त्र विभाग व पुण्याच्या ललित कला अकादमीच्या प्राध्यापकांना गेस्ट लेक्चर म्हणून निमंत्रित करण्यात येणार आहे. राज्यातील नाट्य तज्ञांच्या समितीने ड्रामा स्कूलचा अभ्यासक्रम तयार केला आहे. ड्रामा स्कूलमध्ये नाटकाची इत्यभूत माहिती देण्यात येणार आहे. त्यात नाटकातील अभिनय आणि कॅमेऱ्यासमोर सिनेमा व मालिकांमधील अभिनय यातील फरक, आवाज आणि वाणी, शब्द उच्चारण व संवाद, रस आणि भाव अभिव्यक्ती, नाट्य अभिवाचन, दिग्दर्शन, नेपथ्य, पार्श्वसंगित, प्रकाशयोजना, पात्र उभारणी नाट्यगृह समजून घेण्यासाठी नाट्यगृह भेटीची सहल या सह अन्य अनेक बाबींची विस्तृत माहिती प्रॅक्टिकलसह दिली जाणार असून सहभागी विद्यार्थ्यांना घेऊन लघु चित्रपट व नाट्य निर्मिती केली जाणार आहे. डॉ . साळुंके यांनी सांगितले की, केवळ वीस जणांनाच पहिल्या बॅचमध्ये प्रवेश दिला जाणार असून फेसबुक व व्हाट्सअप वर ड्रामा स्कूलची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर मोठा प्रतिसाद मिळाल्याने मोजक्याच जागा शिल्लक आहेत. इच्छुकांनी डॉ. सतीश साळुंके ९४ २२२ ९५ ३५२ यांच्याशी संपर्क साधावा असे ड्रामा स्कूल तर्फे कळवण्यात आले आहे.

**Change In Name**

I declare by this publication about change in my name
Old name: Jogade Mukunda Lahurao
New name: Jogade Mukund Lahurao
Address: at. Navnath nagar, Majalgaon Tq.Majalgaon Dist. Beed
Mo+91 84213 55757

दैनिक राज्य लोकतंत्र
महासंग्राम
शनिवार दि.११ मे २०२४


# आगामी पाच वर्षात बीड जिल्हा विकासाच्या उंचीवर नेणार

## नेकनूरच्या विराट सभेत पंकजाताई मुंडे यांचा विश्वास; आपला विजय निश्चित ;आगामी चार दिवस संयमाने, हिम्मतीने काम करा




**नेकनूर । प्रतिनिधी**

माझा सर्व परिवार म्हणजे तुम्ही सर्वजण आहात. मी कधीही विकास निधी देताना भेदभाव अथवा जातीवाद केला नाही. जिल्ह्यावर माझे खूप प्रेम आहे. या जिल्ह्यातील मातीने माझ्या वडिलांना घडवले. मुंडे साहेबांना तुम्ही सर्वांनी प्रचंड साथ दिली, त्या उपकाराची परत मी माझ्या कातड्याची जोडी केली तरी करू शकत नाही. पाच वर्षे मंत्री असताना विविध विकासकामे या भागात करता आली. ग्रामपंचायत इमारत, पंचायत समिती इमारती बांधल्या, अनुदान दिले. बचतगटांना निधी मिळवून दिला. ऊसतोड कामगारांना मानधन तसेच मुकादमांना कमिशन वाढवून दिले. हे सर्व करत असताना मी तुम्हा सर्वांचे आशीर्वाद मिळवले. अजूनही तुमच्या सर्वांसाठी मला भविष्यात असे चांगले काम करायचे आहे. दिवंगत मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बेटी पंकजाला आम्ही दिल्लीला आणण्याचा निश्चय केल्याचे स्वतः पंतप्रधान मोदीजींनी अंबाजोगाईच्या सभेत सांगितले. तुम्ही काळजी करू नका, तुमची मीच काळजी घेईल. माझ्या बीड जिल्ह्याच्या विकासाची, सार्वभौमत्वाची, बंधुत्वाची आणि सुंदर सलोख्याच्या वातावरणाची तस्करी करण्याचे प्रयत्न या निवडणुकीत हाणून पाडा, आपला विजय निश्चित आहे. आगामी चार दिवस संयम आणि हिमतीने काम करा असे प्रतिपादन पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

नेकनूर येथे आयोजित प्रचार सभेला त्या संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार नमिता मुंदडा, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, गोविंद केंद्रे, नंदकिशोर मुंदडा, जि.प. सदस्य भरत काळे, नारायण शिंदे, गोरक्ष रसाळ, सरपंच अनिता लांडगे, उपसरपंच सचिन शिंदे, अमित देशमुख, सय्यद शोयब, त्रिंबक काळे, अरविंद निर्मळ आदींची उपस्थिती होती.

नेकनुरच्या नावातच 'नेक' आणि 'नूर' आहे. माझ्या कामातही मी 'नेक' आहे, त्यामुळे नेकनूर मला मताधिक्य देणारच. माझ्या 'नेक' असण्याचा 'नूर' तुम्ही सर्वजण वाढवाल हा विश्वास मला असल्याचे सांगत पंकजाताई मुंडे म्हणाल्या, यापूर्वी जिल्ह्याचे पालकमंत्री असताना या परिसरात श्री बंकटस्वामी संस्थानपासून नेकनूर बसस्थानकापर्यंत, प्रधानमंत्री जलजीवन पाणीपुरवठा योजनेपासून स्त्री व कुटीर रुग्णालयापर्यंत कामे केली.सावंतवाडी-बाळापुर रस्ता, मुस्लिम बांधवांसाठी निधी असो ही सर्व कामे करता आली. प्रीतम मुंडे खासदार म्हणून काम करतानाही या भागासाठी निधी दिला. विकास निधी देताना कोणताही भेदभाव आम्ही करत नाही. मंत्री असताना मी बीडला जरी येऊ शकले नाही तरी माझ्या माध्यमातून विकासाचा निधी बीड जिल्ह्यासाठी येत होता. विकासाची कामे झपाटल्यासारखे मी करत होते. त्या प्रत्येकवेळी जिल्ह्यातील वंचित आणि उपेक्षित घटकासाठी काम मी केले. ग्रामपंचायत आणि पंचायत समितीसाठी नव्या इमारती बांधता आल्या. लोकांचे अनेक प्रश्न सोडवता आले. स्त्रीची काम करण्याची

पान ३ वर

### आपल्या खासदार संसदेत पहिल्या रांगेत बसणार-आ.नमिता मुंदडा

सभेच्या प्रारंभी आमदार नमितताई मुंडे यांचे भाषण झाले. नेकनुर परिसरात पोलीस ठाणे इमारत असो की रस्त्यांसाठी मिळालेला खोट्यावधीचा निधी असो ही सर्व कामे पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वामुळे आपल्याला मार्गी लावता येत आहेत. पुढच्या कामांसाठी सुद्धा आपल्या सर्वांना पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाची गरज आहे त्या सर्व कामे जनसेवा म्हणून करत आलेल्या आहेत. जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना बचत गटांच्या महिलांसाठी त्यांनी खूप मोठे काम केले. अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढवले. अनेक चांगले निर्णय घेतले. जलसंधारण मंत्री म्हणून केंद्र सरकारनेही पंकजाताईंच्या कामाचे कौतुक केले आहे. ही सर्व विकासाची कामे समोर ठेवून पंकजाताईंना पक्षाने बीड लोकसभेचे उमेदवारी दिली आहे, त्या संसदेत पहिल्या रांगेत बसणाऱ्या म्हणजेच मंत्री म्हणून काम करणार आहेत म्हणूनच येथे १३ तारखेला आपण सर्वांनी पंकजाताई मुंडे यांच्या कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आ.नमिता मुंदडा यांनी केले.

### सभेला गर्दीच गर्दी

नेकनूर आणि मुंडे परिवाराचे कायमच स्नेहाचे नाते राहिलेले आहे. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन वाटचाल करणाऱ्या दिवंगत मुंडे साहेबांच्या लेकीला या निवडणुकीत विजयी मताधिक्य देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेला नेकनूर व परिसरातून प्रचंड मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. काही जणांना जागा मिळाली नाही म्हणून ते चक्क इमारतीवर जागा मिळेल तिथे थांबून पंकजाताईंचे भाषण ऐकत होते. हे पाहून स्वतः पंकजाताई मुंडे यांनीही त्यांना नीट उभे रहा, असे सांगत तुमची ही गर्दी हीच माझ्या विजयाची नांदी असल्याचे सांगितले.

### विकासासाठी मला निवडून द्या

पंकजाताई मुंडे यांचे भाषण सुरू असतानाच उपस्थितांमधून काही जणांनी 'आपल्या विरोधी उमेदवाराने यापूर्वी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष असताना ताई, तुम्ही मंजूर केलेली शाळा दुसऱ्या ठिकाणी नेली' असे सांगितले. तेव्हा पंकजाताई मुंडे यांनी 'हे तुम्ही आता लक्षात ठेवून आपल्या भागाच्या विकासासाठी येत्या १३ तारखेला मला प्रचंड मताने निवडून द्या' असे आवाहन केले तेव्हा उपस्थित आणि प्रचंड टाळ्यांचा कडकडाट करत पंकजाताईंना प्रतिसाद दिला.

# बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी महाविकास आघाडी एकवटली

## शिरूर तालुक्याच्या विकासासाठी बजरंग सोनवणे यांना विजयी करा -दिपक खोले

**शिरूर । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून शिरूर कासार तालुक्याचा विकास रखडला असून विकासाचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी शिरूर तालुक्यातील जनतेने भावनिक आणि जातीपातीच्या राजकारणाला बळी न पडता विकास कामाला प्राधान्य देणाऱ्या महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरदचंद्र पवार गट ) चे तालुका अध्यक्ष दिपक खोले यांनी केले आहे. बजरंग बाप्पाच्या विजयासाठी महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी एकवटले असल्याचेही त्यांनी



यावेळी सांगितले आहे.

बीड लोकसभा निवडणुकीचे मतदान अवघ्या दोन दिवसावर आले असल्याने जिल्ह्यात राजकीय हालचालीला प्रचंड वेग आला आहे. शिरूर कासार तालुक्यातुन बजरंग सोनवणे यांना जास्तीत जास्त मतदान मिळवून विजयी करण्यासाठी शिरूर तालुक्यातील महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या जोमाने कामाला लागले आहेत. बुधवार दि. ९ मे रोजी शिरूर शहरात झालेल्या प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांच्या सभेने मतदार बांधवांचे मनामध्ये मोठे परिवर्तन झाले असून आता तालुक्यामध्ये बजरंग बप्पा सोनवणे यांचे वारे वाहू लागले आहे. यामुळे तालुक्यातील जनतेने आता भावनिक व जातीपाती राजकारणाला बळी न पडता शिरूर तालुक्यात विकासाचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी मतदार बांधव बजरंग बप्पा सोनवणे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी( शरदचंद्र पवार गट)चे तालुका अध्यक्ष दिपक खोले यांनी केले आहे.

# अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचार रथावर अज्ञाताचा हल्ला

## तर शहरातील प्रचारार्थ लावलेली पोस्टर फाडली

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार हा ४८ तासात थंडावणार आहे यासाठीच उमेदवार मोठ्या ताकतीने आप आपला प्रचार करताना पाहायला मिळतात मात्र वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहर वर लावलेले बॅनर आणि शहरात फिरत असलेले प्रचार रथ यांच्यावर अज्ञातांनी हल्ला चढवत पोस्टर फाडाफाडी केली आहे.

बीड जिल्ह्यात प्रचारांची रणधुमाळी चालू असतानाच प्रत्येक जण आपल्या विरुद्ध उमेदवारावर शाब्दिक हार प्रहार करत आहे मात्र या सगळ्या गोष्टीला आता हिंसक वळण लागल्याचं पाहायला मिळते वंचित




बहुजन आघाडीचे अंबाजोगाई शहरात लावलेले फलक हे फाडण्यात आले आहे आणि प्रचार अर्थ फिरत असलेला प्रचार रथ यावर हल्ला करत यावरील वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अँड.प्रकाश आंबेडकरांची फोटो हे फाडण्यात

पान ३ वर

# आण्णांच्या नेतृत्वाखाली संजयनगरवासिय पंकजाताईना मतांची लीड देतील - दादासाहेब गिरी

**गेवराई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मा.मंत्री पंकजाताई मुंडेना उमेदवारी दिली आहे तरी विधानसभा मतदारसंघातुन पंकजाताई मोठ्या प्रमाणात मताधिक्य देण्याची जबाबदारी आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी आपल्या खाद्यावर घेतली त्यामुळे आण्णांनचे कार्यकर्त्य म्हणून पंकजाताई मुंडेना जास्तीत जास्त मतदान मिळावे यासाठी सर्वानी प्रयत्न करून घेऊन आपल्या भागातुन जास्तीत जास्त मताधिक्य देण्यासाठी सर्वजण सज्ज आहेत तरी आपले सर्व प्रश्न मार्गी लावणारे आपले नेतृत्व आज पंकजाताईच्या पाठीशी खंबीरपणे मागे आहेत म्हणून सोमवार १३ रोजी संजयनगर वासिय आण्णांनच्या नेतृत्वाखाली पंकजाताई मुंडेना मताची लीड देतील असा विश्वास मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यांनी व्यक्त केला आहे

पुढे ते म्हणाले की देशात पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या दहा वर्षांत गोरगरी कल्याणकारी योजनेंतर्गत देशातील गोरगरीबांना आधार देण्यांचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे स.न.२०१४ च्या



पंकजाताई मुंडेच्या प्रचारार्थ घरोघरी जाऊन कार्यकर्त्यांनी मतदारांना विनंती केली

विधानसभा निवडणुकीत आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या रुपाने एक प्रमाणिक आमदार गेवराईकरांना मिळाला आहे त्याच्या मुळेच मतदारसंघाचा कायापालट झाला आसल्याचे दादासाहेब गिरी यांनी म्हटले आहे

आज दिनांक आठ रोजी संजय नगर भागामध्ये लोकसभा निवडणुकीच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुडे

पान ३ वर

# मुंडेंच्या वारसदारांना हे शोभत नाही; न्याय मिळवण्यासाठी उपोषण हा लोकशाहीचा कणा- प्रा. सुरेश नवले

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे हे नेहमीच पत्रकारांशी संवाद साधायचे विशेषता निवडणुका काळात मुंडे साहेब किमान तीन दिवसाला पत्रकार परिषद घ्यायचे. मात्र मुंडे यांचे वारसदार म्हणणाऱ्या आजी-माजी पालकमंत्र्यांनी पाच वर्षात एकही पत्रकार परिषद घेतल्याचे ऐकवात नाही तसेच आरक्षणासाठी मनोज जरांगे यांच्या उपोषणाची हेडाळणी करून उपोषणाने आरक्षण मिळत नसते असे माजी पालकमंत्री म्हणाल्या.या वक्तव्याचा मी निषेध करतो. कारण उपोषण आंदोलने हा लोकशाहीचा कणा असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले यावेळी माजी आ.उषाताई दराडे, माजी आ. सय्यद सलीम यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्रा. सुरेश नवले म्हणाले की उपोषण आंदोलन हा




लोकशाहीचा कणा आहे आणि याच मार्गाने आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरू ठेवले .मात्र या आंदोलनाची हेडाळणी करत माजी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी त्यांचा नव्हे तर लोकशाहीचा अपमान केला. या वक्तव्याचा निषेध करत प्रा. सुरेश नवले यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे हे कायम पत्रकारांशी संवाद साधत असत. बीड जिल्ह्यातील पत्रकारांकडून विविध विषयावर चर्चा करून माहिती घ्यायचे आणि त्याप्रमाणे निर्णय घ्यायचे. माजी पालकमंत्री पंकजाताई मुंडे व आजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी गेल्या पाच वर्षात एकही पत्रकार परिषद घेतल्याचे माझ्या तरी ऐकीवात नाही मी एकनाथराव शिंदे यांना सोडून उद्धव ठाकरे यांच्या गटात आल्याचे बोलले जात आहे. मात्र मी कुठल्याही पक्षात गेलो नाही आणि जाणार नाही प्रा. नवले मित्र मंडळाच्या माध्यमातून काम करणार आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये अनेक विद्यमान खासदारांना डावलून इतरांना तिकीट दिले ही बाब सहन न झाल्याने आपण पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. हुकूमशाही पद्धतीने काम चालत असल्याने आणि ते मला मान्य न झाल्यानेच मी पक्ष सोडलेला आहे. आगामी काळात कुठल्या पक्षात जाणार या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी कुठल्याही पक्षात जाणार नसल्याचे स्पष्टपणे सांगितले.

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी छत्रपती उदयनराजे भोसले आज बीड जिल्ह्यात

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी छत्रपती उदयनराजे भोसले उद्या जिल्ह्यात येत आहेत. उद्या त्यांच्या तीन ठिकाणी जाहीर सभा होणार असून सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा उद्या शनिवारी शेवटचा दिवस आहे. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या सभेनंतर उद्या छत्रपती उदयनराजे भोसले पंकजाताईंसाठी जाहीर सभा घेणार



आहेत. शनिवारी सकाळी १० वा. कडा (आष्टी) येथे अमोलक जैन विद्यालय परिसर येथे, दुपारी १ वा. युसूफ वडगाव (केज) येथे बसवेश्वर चौक तर दुपारी २ वा. परळी वैजनाथ येथे मोंढा मैदान येथे उदयनराजे भोसले

### कडा, युसूफ वडगाव, परळी येथे होणार जाहीर सभा ; छत्रपतींच्या दौऱ्याने होणार पंकजाताईंच्या विक्रमी विजयावर शिक्कामोर्तब

जाहीर सभेस संबोधित करणार आहेत. या तीनही सभेला उदयनराजे हेलिकॉप्टरने येणार असून सभेला पंकजाताई देखील त्यांच्यासमवेत असणार आहेत. दरम्यान, या सभेमुळे पंकजाताई मुंडे यांच्या विक्रमी विजयावर शिक्कामोर्तब होणार असून मतदारांनी मोठ्या संख्येने सभेला उपस्थित रहावे असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्याचे युवक क्रीडा कल्याण मंत्री मा. ना. संजयजी बनसोडे यांनी राजकिशोर मोदी निवासस्थानी भेट दिली. यावेळी बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मतांनी व कशा प्रकारे मताधिक्य देता येईल याबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच अंबाजोगाई शहर म्हणजेच राजकिशोर मोदी असे समीकरण असल्याचे याप्रसंगी ना संजयजी बनसोडे यांनी आवर्जून उल्लेखित केले. यावेळी त्यांच्या सोबत माजी जी प अध्यक्ष राहुल केंद्रे,दालमील



### महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या विजयासंदर्भात विस्तृत असा विचारविनिमय

युनियन चे अध्यक्ष सुदर्शन मुंडे हे उपस्थित होते. याप्रसंगी माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली निवडणूकीच्या वातावरणाबाबत माहिती जाणून घेतली.यावेळी राजकिशोर

पान ३ वर

# लोकसभा निवडणुकीवर ग्रामस्थांचा बहिष्कार

**परळी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघासाठी १३ मे रोजी होणाऱ्या मतदानावर परळी तालुक्यातील करेवाडी ग्राम पंचायत अंतर्गत असलेल्या महादेव तांडा ग्रामस्थांनी पूर्णपणे बहिष्कार घातला असून याबाबत परळी तहसीलदारांना निवेदन दिले आहे. तांडा वरील सर्वच ग्रामस्थांनीच निवडणुकीवर बहिष्कार घातल्याने खळबळ उडाली आहे.

परळी तालुक्यातील महादेव तांडा हे करेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येत असून महादेव तांडा

### मूलभूत सुविधा पूर्ततेची मागणी

येथील काही नागरिकांनी रस्ता नसल्यामुळे वेळोवेळी निवेदन दिले मात्र तांड्यातील रस्त्याचा प्रश्न सुटलेला नाही. तांड्या वरील रहिवासी यांना विजेचा पुरवठा नाही,समाज मंदिर व सभागृहासाठी दोन वेळेस निवेदन देऊन देखील काम करण्यात आलेले नाही.

तांड्यावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाविषयी इंजिनिअर यांना

पान ३ वर

# पंकजाताई सारख्या ताकतवर नेतृत्वाला साथ द्या -इंजि.बडे

**शिरूरकासार । प्रतिनिधी**

बीड लोकसभेचेच्या निवडणुकीमध्ये सध्या अनेक नेते आरोप प्रत्यारोप करुण मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत.परंतु मतदारांनी सर्व बाजू तपासून आपल्या देशाच व आपल्या जिल्ह्याचं हित कशात आहे हे लक्षात घेऊन पंकजा ताईंना लोकसभेत पाठवावे. आपल्या मराठवाड्यामध्ये या पूर्वी चार ताकतवर नेतृत्व होऊन गेली. त्यामध्ये स्व.मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाणसाहेब, स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडेसाहेब,



स्व.प्रमोदजी महाजनसाहेब व स्व.विलासरावजी देशमुख साहेब.या चारही नेत्यांचा त्यांचा पक्षात एक वेगळा आदर होता.त्यांना जनतेने ताकत दिली व त्यांच्या कर्तुत्वाने त्यांनी जनतेच्या मनावर राज्य केले.स्व.शंकरराव चव्हाण साहेब मुख्यमंत्री झाले.स्व.लोकनेते मुंडे साहेब विरोधी पक्षनेते,उपमुख्यमंत्री राहिले, विलसरावजी देशमुख साहेब मुख्यमंत्री राहिले,महाजन साहेब पंतप्रधान वाचपेयी साहेबांचे सल्लागार होते.या चारही नेत्यांची त्यांच्या पक्षात छाप होती.या चारी नेत्यांनी त्यांच्या कालखंडात लोकाभिमुख काम केले.हे चारही नेते आज आपल्या मध्ये नाहीत,याची उनीव मराठवाड्यातील जनतेला भासत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.११ मे २०२४ । पान ७

# आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लक्ष; बारामतीत जोरदार चुरस

**बारामती । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. आरक्षणाच्या मुद्यावरून या निवडणुका गेल्या दोन-अडीच वर्षांपासून रखडल्या आहेत. या निवडणुकीसाठी अनेक इच्छुकांनी तयारी केली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींची रणधुमाळी सुरू होण्याची चिन्हे आहेत. बारामती तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सर्व निवडणुका ताकदीने लढण्याचे संकेत लोकसभा निवडणुकीतून मिळाले आहेत.



लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लागले आहे. बारामती तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची एकहाती सत्ता आहे. सर्व प्रमुख संस्था पर्यायाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यात असल्याने त्यांच्याकडे कार्यकर्ते आणि पदाधिकार्यांची संख्या सर्वाधिक आहे. याउलट राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडे मातब्बर पदाधिकारी नाहीत. मात्र, सर्वसामान्य तरुण कार्यकर्त्यांची फळी तयार करण्यात त्यांना यश आले आहे.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे कार्यकर्त्यांची नवीन फळी तयार झाल्याने त्यांच्याकडे नवीन नेतृत्व करण्याची संधी तरुणांना आहे. याअगोदर प्रमुख पदाधिकारी अजित पवार यांच्या गटाकडे होते. अजित पवार यांची तालुक्यावर एकहाती सत्ता असल्याने ते जो उमेदवार देतील तोच उमेदवार निवडून आणण्यात त्यांना आतापर्यंत यश आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीतील चुरस पाहता येणार्या सर्व निवडणुका तुल्यबळ होण्याची चिन्हे आहेत.

# मीना नदी व घोड शाखेला त्वरित पाणी सोडा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे मागणी

**आंबेगाव । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांसाठी वरदान ठरलेल्या मीना नदी व डिंभे धरणाची (हुतात्मा बाबू गेणू जलसागर) घोड शाखा सध्या कोरडेठाक पडली आहे. त्यामुळे अनेक गावांमधील पिण्याचे पाणी, जनावरांच्या चारा पिकांचा प्रश्न गंभीर बनला आहे. मीना नदी व घोड शाखेला त्वरित पाण्याचे आवर्तन सोडा, अशी मागणी शेतकर्यांच्या वतीने शरद सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव लोंढे व तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष रमेश खिलारी यांनी केली.



या संदर्भातील निवेदन लोणी (ता. आंबेगाव) येथे नुकत्याच लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत शेतकर्यांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले. वाढत्या तापमानामुळे मीना नदीपात्र व डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याची घोड शाखा कोरडीठाक पडली आहे. त्यामुळे तालुक्याच्या पूर्व भागातील थोरांदळे, जाधववाडी, कारफाटा, खडकी, नागापूर, वळती, भराडी, शिंगवे आदी गावांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांची चारा पिकेदेखील जळाली आहेत. जलसंपदा विभागाने मीना नदीपात्र व घोड शाखेत त्वरित पाणी सोडणे गरजेचे आहे, असे निवेदनात नमूद केले आहे.

# पराभवाच्या भीतीने आढळरावांना निवडणूक लढवायला पुढे केले: रोहित पवारांचा दावा

**शिरूर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवारांना त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला किंवा पक्षातील एका बड्या नेत्याला शिरूरच्या जागेवर लढवायचे होते, मात्र शिरूर लोकसभेचा सर्व्हे समोर आला तेव्हा त्या सर्व्हेमध्ये असे दिसले की, खा. डॉ. अमोल कोल्हे ही निवडणूक तीन लाखांनी जिंकू शकतात;



त्यामुळे त्यांनी बरीच शोधाशोध करूनही त्यांना कोणीच उमेदवार मिळाला नाही; म्हणून त्यांनी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना पुढे केले, असे आ. रोहित पवार यांनी म्हटलं आहे. ते डॉ. अमोल कोल्हे यांच्या शिरूर येथील प्रचार सभेत बोलत होते. माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांना पुणे 'म्हाडा'चे अध्यक्षपद देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यात आले होते, त्यामुळे ते ही निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक नव्हते, असे आ. रोहित पवार म्हणाले. भाजपने अनेक नेत्यांना 'ईडी'ची भीती दाखवून पक्षात घेतलं, नेत्यांनीही तुरुंगापेक्षा भाजप बरा असं म्हणत पक्ष प्रवेश केला, भाजपने महाराष्ट्रातील स्वाभिमानी पक्ष फोडण्यासाठी अनाजी पंताची नीती वापरली, हे आता सर्वसामान्य मतदारांच्या लक्षात आलं असल्याचे या वेळी आ. रोहित पवार म्हणाले.

दौंड तालुक्यातील एका खासगी कारखान्याला ऊस मिळावा म्हणून आ. अशोक पवारांच्या ताब्यातील घोडगंगा सहकारी साखर कारखाना आर्थिक कोंडी करून जाणूनबुजून बंद पाडला असल्याचा आरोपही आ. रोहित पवारांनी या वेळी केला.

# यात्रा भरविण्याच्या कारणावरून उपसरपंचावर कोयत्याने वार

**खेड । प्रतिनिधी**

यात्रा भरवायला विरोध असताना नियोजनाच्या बैठका का घेतल्या अशी विचारणा करीत येणवे खुर्द, ता. खेड येथील उपसरपंच अनिल काळूराम आतकर, वय ४० वर्षे याच्यावर गावातील दोघांनी इतर तीन जणांच्या मदतीने कोयत्याने जिवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. सध्या गावोगावी यात्रा जत्रांचा हंगाम सुरु आहे. या यात्रांमध्ये मतभेद होण्याचे प्रमाण वाढले असुन येणवेच्या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.



रामदास दिलीप जाधव, योगेश दिलीप जाधव, किरण सुरेश जाधव सर्व मुळ राहणार येणवे खुर्द, तर नोकरी व्यवसाय निमित्त सध्या राहणार बाहेरगावी आणि दोन अनोळखी मित्रांवर खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येणवे गावची यात्रा दिनांक १४ रोजी आहे. या यात्रेवरून गावात मतभेद आहेत. हल्लेखोरांचा यात्रेला विरोध होता. तर माजी सरपंच काळूराम आतकर यांचा मुलगा व उपसरपंच अनिल याने यात्रेसाठी ग्रामस्थांच्या बैठका घेतल्या होत्या.

याचा राग मनात धरून हल्लेखोरांनी गुरुवारी (दि ९) रोजी जखमी अनिल व त्याचा मित्र गावालगत असलेल्या चिखलगावच्या चौकात उभे असताना चाराचाकित येऊन हल्ला केला. लोखंडी घन, कोयत्याने जिवघेणा हल्ला केला. तसेच पिस्तुल दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे पोलिस तक्रारीत म्हटले आहे. जखमी अनिल याच्यावर राजगुरुनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिस निरिक्षक राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली खेड पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# दुकाने पाण्यात; राजगुरुनगरमधील दुकानदारांचे नुकसान

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

शुक्रवारी दि. ९) दुपारी पंधरा मिनिटे जोराचा पाऊस झाला. पावसामुळे शहरातील रस्ते जलमय झाले होते. शहरातील अत्यंत गजबजलेल्या वाडा रस्त्यालगतच्या दुकानांमध्ये पाणी गेल्याने अनेक



व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

या रस्त्याचे नुकतेच काँक्रिटीकरणाचे काम झाले आहे. मूळ डांबरी रस्त्यावर खोदाई न करता दोन ते अडीच फूट उंच रस्ता तयार करण्यात आला आहे. यामुळे उत्तर बाजूची घरे आणि दुकानाचे जोते खाली गेले आहेत. तुलनेने थोडाच पाऊस झाला तरी लगेचच जवळपास ५० मिळकतींभोवती पाण्याचे तळे साठले. अनेकांना दुकानातील साहित्य वाचविताना धावपळ करावी लागली. ज्यांना शक्य झाले नाही त्यांचे नुकसान झाले. रस्ता मूळ स्तरावर झाला असता तर येथील मिळकतधारकांवर ही वेळ आली नसती. रस्त्याचे काम होताना मूळ रस्त्याची खोदाई करून काम केले असते, तर आताच्या उंच रस्त्याची उंची कमी झाली असती. मात्र, ठेकेदाराच्या हितासाठी अधिकारीवर्गाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# खासगी बसचालकांकडून प्रवाशांची लूट! तिकीट दरात तिप्पट वाढ

**हडपसर । प्रतिनिधी**

शाळा आणि महाविद्यालयांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्याने नागरिक मुलांसह गावी जात आहेत. मात्र, एसटी महामंडळाच्या बसची संख्या अपुरी असल्याने नागरिकांना खासगी बसच्या तिकिटासाठी तिप्पट पैसे मोजावे लागत आहेत. यामुळे सोलापूर रोडवर खासगी बसचालकांकडून प्रवाशांची लूट सुरू आहे. प्रवाशांकडून सोलापूर मार्गावरून जाण्यासाठी गाडीतळ येथून जादा बस सोडण्याची एसटी महामंडळाकडे मागणी होत आहे.

उन्हाळ्याच्या सुट्यांमुळे गावाकडे जाणार्या प्रवाशांची संख्या सध्या वाढली आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपूसन हडपसर येथे सोलापूर रोडवर प्रवाशांची गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. गाडीतळ रवीदर्शन येथे एसटी महामंडळाचा बस थांबा आहे. सोलापूर, तुळजापूर, लातूर, उदगीर, उमरगा, धाराशिव, अक्कलकोट, अकलूज, जामखेड, बार्शी, करमाळा, श्रीगोंदा, हैदराबाद, तेलंगणा, या मार्गांवरील एसटी बस हडपसर येथून जातात. त्यामुळे दररोज रात्री आठनंतर प्रवाशांची गाडीतळ रवीदर्शन ते पुढे सोलापूर रोड लक्ष्मी कॉलनीपर्यंत गर्दी होत आहे.एसटी बसची संख्या अपुरी असल्यामुळे प्रवासी खासगी बससह इतर वाहनांचा आधार घेत आहेत. याचा फायदा घेऊन खासगी बसमालकांनी तिकीट दर तिपटीने वाढवले असल्याचे प्रवाशांकडून सांगण्यात आले. एसटी बसची तासन् तास वाट पाहूनदेखील शहरातून त्या भरून येत असल्याने प्रवाशांना नाइलाजस्तव तिप्पट पैसे देऊन खासगी बसने प्रवास करावा लागत आहे. इतर खासगी वाहनचालकदेखील प्रवाशांकडून जास्त पैसे घेत आहेत. तसेच, क्षमतेपक्षा जास्त प्रवासी भरून ते धोकादायक पद्धतीने प्रवाशांची वाहतूक करीत आहेत. याकडे हडपसर वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# कुकडी प्रकल्पात ९ टक्केच साठा; शेतकरी चिंतेत

नारायणगाव : : गतवर्षी पाऊस कमी झाल्याने आणि उन्हाळा अतिशय कडक असल्याने कुकडी प्रकल्पातील पाणीसाठा प्रचंड कमी झाला आहे. सध्या कुकडीमध्ये केवळ ९.११ टक्के इतकेच पाणी शिल्लक राहिले आहे. त्यामुळे अर्धा मे महिना, त्यानंतर जून व जुलैअखेर हे पाणी कसे पुरणार? अशी चिंता शेतकरीवर्गाला लागली आहे. कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभा, माणिकडोह, वडज, चिल्हेवाडी, पाचघर, येडगाव ही धरणे आहेत. या ६ धरणांमधील पाण्याचा साठा कमालीचा घटला आहे. उन्हाळा कडक असल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होत आहे. सध्या डिंभे धरणातून ४०० क्यूसेक्स प्रतिसेंकद वेगाने पाणी येडगाव धरणात सोडले जात आहे. तथापि येडगाव धरणातून देखील ११ नंबर दरवाजाद्वारे



कुकडी नदीच्या पात्रातून पूर्व भागातील बंधारे भरण्यासाठी तसेच शिरूर नगरपरिषदेच्या हद्दीतील बंधारे भरण्यासाठी पाणी सोडण्यात आले आहे.

सध्या येडगाव धरणामध्ये अवघा १७.७५ टक्के पाणीसाठा आहे, तर माणिकडोह धरणात सर्वात कमी म्हणजे २.८३ टक्के, वडजमध्ये २०.१३ टक्के, पिंपळगाव जोगे ३.६४ टक्के, डिंभे १३.५५ टक्के इतकेच पाणी शिल्लक आहे. येडगाव धरण परिसरामध्ये शेतकर्यांच्या पाइपलाइन आहेत. तसेच कुकडी नदीच्या दोन्ही बाजूने देखील शेतकर्यांचे वीजपंप आहेत. परंतु सध्या धरणातील पाण्याचा साठा कमालीचा कमी झाल्याने शेतकर्यांची मोठी अडचण निर्माण होऊ लागली आहे. पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात असल्याने शेतकर्यांना वीजपंप नदीपात्रात आतमध्ये नेत अधिकचे पाइप बसवून घ्यावे लागत आहेत.

येडगाव परिसरामध्ये अनेक शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणात टोमॅटोची लागवड केली आहे. पाऊस पडेपर्यंत जर धरणात पाणी शिल्लक राहिले नाही; तर करायचे काय? तसेच पाण्याचा साठा कमी झाल्यावर उर्वरित पाणी फक्त पिण्यासाठी राखून ठेवले; तर मात्र पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकर्यांना मोठी धास्ती लागलेली आहे.

येडगाव परिसरातील शेतकर्यांच्या वीजपंपांची केबल चोरीला जाण्याचे प्रकार पुन्हा वाढले आहेत. मागच्या १५ दिवसांपूर्वी ९ ते १० शेतकर्यांच्या वीजपंपांची केबल चोरीला गेल्याने जवळपास २ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबतची पोलिसांत तक्रार देऊनदेखील काही उपयोग होत नाही. त्यामुळे अनेकदा शेतकरी पोलिसांत तक्रार देत नाहीत, त्यामुळे चोरट्यांचे चांगलेच फावत आहे.

# रक्तपुरवठा बंद पडल्याने निकामी झालेल्या पेशींवर यशस्वी उपचार

**पुणे । प्रतिनिधी**

रक्तपुरवठा बंद पडल्याने हाडांच्या पेशी निकामी होण्याच्या स्थितीला 'अव्हॅस्क्युलर नेक्रॉसिस' म्हणतात. एक तरुण महिला या आजाराने ग्रस्त होती. पारंपरिक उपचारांनीही खुबा व नितंबातील वेदना कमी होत नव्हत्या. अशा वेळी अत्याधुनिक उपचारपद्धतीने शस्त्रक्रिया करून महिलेला बरे करण्यात डॉक्टरांना यश मिळाले. महिला रुग्णाच्या रेडिओलॉजिकल तपासण्यांमधून अव्हॅस्क्युलर नेक्रॉसिसचे निदान झाले.



त्यानंतर मणक्यात भूल देऊन शस्त्रक्रिया करण्यात आली. निकामी झालेल्या पेशी क्युरेट हे शस्त्रक्रिया उपकरण वापरून अचूकतेने काढण्यात आल्या. निरोगी हाडांच्या पेशींना धक्का न लावता बाधित झालेली जागा साफ करता आली. रुग्णाच्या मानेतून हाडाचा तुकडा या साफ केलेल्या बाधित जागेत बसविण्यात आला. त्यानंतर पेशींच्या पुनर्निर्मितीसाठी बोनमॅरो ॲस्पिरेट कॉन्सन्ट्रेट (बीएमएसी) हे इंजेक्शन देण्यात आले. रुग्णालयात एक-दोन दिवसांच्या देखभालीनंतर महिलेला घरी सोडण्यात आले. प्रक्रियेत वापरले जाणारे स्वयं-शोषक टाके दोन आठवड्यात पडले आणि हळूहळू रुग्णाला आपले दैनंदिन कार्य सुरू करता आले.

# शिव संस्कारसृष्टीची जागा हडपण्याचा प्रयत्न; अजित पवारांची कोल्हेंवर नाव न घेता टीका

**नारायणगाव । प्रतिनिधी**

शिव संस्कारसृष्टीची वडजची जागा हडपण्याचा ते प्रयत्न करत होते, असा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरूर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार खा. अमोल कोल्हे यांचे नाव न घेता केला. ती जागा आता वाचवायची आहे, अशी पुष्टीही पवार यांनी दिली. महायुतीचे शिरूरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी ओतूर येथे आयोजित सभेत अजित पवार बोलत होते. ते पुढे म्हणाले, मागील वेळी कोल्हेंना तिकीट दिलं ही माझी राजकीय जीवनातली चूक होती, ती चूक सुधारण्यासाठी मी आलोय. खासदार म्हणून निवडून आल्यावर ते चित्रपट आणि मालिकांमध्येच रमले. आदिवासी भागात फिरकले नाहीत की कोणाला भेटले नाहीत. या वेळी मात्र बिनकामाचा नको, तर कामाचा माणूस म्हणून आढळराव यांना लोकसभेत पाठवा, असे आवाहन त्यांनी केले.



विधानपरिषदेचे गटनेते भाजप आमदार प्रवीण दरेकर, जुन्नरचे आमदार अतुल बेनके, माजी आमदार शरद सोनवणे, भाजप नेत्या आशाताई बुचके, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव लांडे, शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा, जुन्नर बाजार समिती सभापती ॲड. संजय काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष समद इनामदार, तालुकाध्यक्ष पांडुरंग पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष संतोषनाना खैरे, रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष पोपट राक्षे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराम लांडे, माजी उपाध्यक्ष अरुण गिरे, गणपत फुलवडे, माजी आरोग्य सभापती मंगलदास बांदल, माजी सदस्य भानुविलास गाढवे, बबन तांबे, भाऊसाहेब देवाडे, विनायक तांबे, अभिजित शेरकर, विश्वास आमले, दिलीप डुंबरे, तान्हाजी तांबे, उज्ज्वला शेवाळे, दत्ता गवारी, तसेच महायुतीचे विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आढळराव म्हणाले, दत्तक घेतलेल्या गावालादेखील कोल्हे कधी गेले नाहीत. त्यांनी पाच वर्षे काही काम केले नाही, पण या बिनकामाच्या माणसाने गेल्या दोन-तीन महिन्यांत मात्र करामती केल्या, वाट्टेल तसे बोलू लागलाय. बैलगाडा शर्यत मी सुरू केली, रेल्वे मी आणली अशी दोन आणि तीन महिन्यांत कामे होत असतात का? असा टोला लगावत अमोल कोल्हे यांचे मानसिक संतुलन बिघडल्याचा आरोप त्यांनी केला. प्रवीण दरेकर म्हणाले, पराभव दिसू लागल्याने कोल्हेंनी रडीचा डाव सुरू केलाय. इकडे पैसे वाटले, तिकडे पैसे वाटले, असे ते म्हणू लागले आहेत. पण, तुम्ही लक्षात ठेवा की तुमच्याकडे राहुल गांधी, आमच्याकडे नरेंद्र मोदी आहेत. या दोघांची तुलना होऊ शकत नाही. मुस्लिम समाजानेही आम्ही या मातीतले आहोत, विकासाचे पाईक आहोत, म्हणून आमच्या मागे राहा, असे त्यांनी आवाहन केले. मुस्लिमांचे व्हिडीओ व फतवे काढून ध्रुवीकरण करायचे काम सुरू आहे, असा आरोप त्यांनी विरोधकांवर केला. शरद सोनवणे म्हणाले, आदिवासी भागातील पाण्याचे, बुडीत बंधार्याचे, एमआय टॅकचे प्रश्न मार्गी लावायला हवेत. ही लढाई कोल्हे-आढळराव यांची नाही, तर देशाची आहे. देशाच्या भविष्यासाठी अतुल बेनके, आशाताई बुचके आणि मी एकत्र आलो आहोत. आणि आढळराव यांना निवडून आणण्यासाठीच आम्ही एकत्र आहोत, असे ते म्हणाले.

# पहिल्याच दिवशी हडपसर-गुवाहाटी विशेष रेल्वेचा फज्जा! ऐनवेळी प्रवाशांची धावपळ




पुणे : : हडपसर टर्मिनलवरून सोडण्यात येणारी 'हडपसर-गुवाहाटी' पहिलीच विशेष रेल्वे (ट्रेन क्र. ०५६०९) गुरुवारी (दि.९) तब्बल १० तास उशिराने सुटली. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड मानसिक त्रास झाला अन् त्यांची चांगलीच धावपळ उडाली. पुणे परिसरातून आलेल्या काही नागरिकांना येथे रेल्वेची चक्क १० तास वाट पाहत हडपसर टर्मिनलवर बसून राहावे लागले. यावरून रेल्वेचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे.

पुणे रेल्वे स्थानकावरील अतिरिक्त बोजा कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने हडपसरमध्ये टर्मिनल उभारले आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासन आता हडपसर टर्मिनलवरून गाड्यांची संख्या वाढवत आहे. त्यानुसार 'हडपसर-गुवाहाटी' विशेष गाडीच्या एकूण १६ फेर्या येथून होणार आहेत. यातीलच गुरुवारी (दि.९) प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष गाडी हडपसरमधून सुरू होणार होती. मात्र, विशेष गाडीच्या पहिल्या फेरीलाच ग्रहण लागले अन् प्रवाशांना तब्बल दहा तास उशिरा प्रवास सुरू करावा लागला.